


महाराष्ट्र

# संरक्षित क्षेत्र वार्तापत्र

वन्यजीव संरक्षणविषयक घडामोडींचे त्रैमासिक

खंड २, अंक २ एप्रिल २०२१ (क्र.५)


## अनुक्रमणिका


**संपादकीय** ३

‘वन्यजीव’ नव्हे ‘व्याघ्र’ वृत्तांकन

**संरक्षित क्षेत्रातील बातम्या**

कर्नाळा अभयारण्य ४

मुंबई-गोवा महामार्गाच्या कर्नाळा अभयारण्यातून जाणाऱ्या टप्प्यात दुतर्फा ध्वनिरोधक

कोका अभयारण्य ४

कोका अभयारण्यातील वणव्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी उपाययोजना

गौताळा औट्रमघाट अभयारण्य ४

तब्बल ८१ वर्षांनंतर गौताळा औट्रमघाट अभयारण्यात वाघाच्या अस्तित्त्वाची नोंद

चांदोली अभयारण्य ५

चांदोली अभयारण्यातील पुनर्वसन रखडलेल्या गावांचे आंदोलन तात्पुरते स्थगित

टिपेश्वर अभयारण्य ५

पर्यटनाचे नियम मोडणारे टिपेश्वर अभयारण्यातील वाहनचालक व मार्गदर्शक निलंबित

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प ६

कोरोनाचा प्रसार रोखण्यासाठी टाळेबंदीमुळे ताडोबा अंधारीतील पर्यटन बंद

वाहनाच्या धडकेत ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील बिबट्याचा मृत्यू; वाहनचालक मद्यधुंद अवस्थेत

ताडोबा अंधारी आणि आर्वी क्षेत्रात दोन वाघांचा मृत्यू

तुंगारेश्वर अभयारण्य ७

सतत लागणाऱ्या आगींमुळे तुंगारेश्वर अभयारण्यासह भोवतालचे वन्यजीवन धोक्यात

नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प ७

नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पात वणवा विझवताना तीन वनमजुरांचा मृत्यू, दोन जखमी

रेल्वेच्या धडकेत नागझिरा अभयारण्यातील वाघाचा मृत्यू

नांदुरमधमेश्वर अभयारण्य ८

पक्षीगणनेत नांदुरमधमेश्वर अभयारण्यात दहा हजारांहून अधिक पक्ष्यांची नोंद

पेंच व्याघ्र प्रकल्प ८

पिंजऱ्यातून पेंच व्याघ्र प्रकल्पात सोडलेल्या वाघिणीचा मृत्यू

मेळघाट व्याघ्र प्रकल्प ८

उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच मेळघाटात तीव्र पाणीटंचाई

वणव्यात मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील जवळपास ४० हेक्टर जंगल भस्मसात

अपुऱ्या मनुष्यबळामुळे मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील कर्मचाऱ्यांवर ताण

वनक्षेत्रपाल आत्महत्या प्रकरणी उपवनसंरक्षकासह मेळघाट प्रकल्पाचे क्षेत्र संचालक निलंबित

मेळघाटात ‘स्केली थ्रश’ पक्ष्याचे दर्शन; छायाचित्रासह पहिलीच नोंद

तीन वर्षांत मृत वाघ सापडल्याची मेळघाटातील पाचवी घटना; सीबीआय चौकशीची मागणी

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान ११

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील पुनर्वसन प्रकरणी न्यायालयाचे सरकारवर ताशेरे

**राज्यस्तरीय बातम्या** ११

राज्यात यंदा तीन महिन्यांत ११ वाघांचा; तर देशात ३९ वाघांचा मृत्यू

राज्यात माणूस-वन्यजीव संघर्षात गेल्या चार वर्षांत २१४ माणसे ठार
चंद्रपूर जिल्ह्यात गेल्या १४ महिन्यांत वाघ, बिबट्यांच्या हल्ल्यात ४० माणसांचा मृत्यू
अवनी वाघीण प्रकरणात वनाधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली
विदर्भातील संरक्षित क्षेत्रांमध्ये पाणीटंचाई आणि पाणवठ्यांवरील शिकारी टाळण्यासाठी नियोजन
माणूस-वन्यजीव सघर्षाचे प्रसंग हाताळण्यासाठी पुणे वन विभागाचे शीघ्र प्रतिसाद दल
व्याघ्र प्रकल्पातून पुनर्वसनासाठी वाढीव रकमेमुळे राज्यात प्रक्रियेला गती येण्याची शक्यता
मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गावर वन्यप्राण्यांसाठी २९५ ठिकाणी उन्नत, भुयारी मार्ग आदी उपाययोजना
महाराष्ट्रातील जंगलांत आग लागण्याच्या घटनांमध्ये दोन वर्षांत दुपटीने वाढ
महाराष्ट्रातील आणखी दोन ठिकाणांना जैवविविधता वारसा स्थळाचा दर्जा
वन्यजीव विषयक गुन्ह्यांच्या तपासात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या वनकर्मचाऱ्यांचा गौरव
महाराष्ट्रात २६ जिल्ह्यांमध्ये मानद वन्यजीव रक्षकांच्या नेमणुका
खवलेमांजराची तस्करी करणारे राज्याच्या विविध भागांतील नऊ जण अटकेत
डॉ. सतीश पांडे यांना ‘वर्ल्ड आऊल हॉल ऑफ फेम’चा पुरस्कार
माणूस-बिबट्या संक्षिप्त वृत्त १९
**राष्ट्रीय बातम्या** १९
भारतातील वाघांचे जनुकीय वैविध्य कमी होण्याची भीती
देशव्यापी व्याघ्रगणनेला एप्रिलपासून सुरुवात
वर्ष २०२१-२१च्या अर्थसंकल्पात पर्यावरण मंत्रालयासाठी तरतुदीत गेल्या वर्षीच्या तुलनेत आठ टक्क्यांची कपात
वनजमिनींच्या वनेतर वापराबाबत निर्णयाच्या राज्य सरकारांच्या अधिकारावर केंद्राकडून मर्यादा
हिमाचल प्रदेशातील दोन संरक्षित क्षेत्रांचे व्यवस्थापन देशात सर्वोत्तम - व्यवस्थापन मूल्यांकन अहवाल
**मृत्यूलेख** २२
उत्तम संपादक आणि सहृदयी माणूस
**दृष्टीकोन** २४
अभयारण्याची लांबलेली क्षेत्रनिश्चिती आणि माळढोक संवर्धन

**महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र**

**खंड २, अंक २, एप्रिल २०२१ (क्र. ५)**

संपादकः रेश्मा जठार

साहाय्यक संपादकः पंकज सेखसरीया

साहाय्यकः राधिका अघोर

शीर्षक व इतर रेखाचित्रेः अश्विनी मेनन Visual Design Studio

प्रकाशकः कल्पवृक्ष

संपादकीय पत्ताः C/o कल्पवृक्ष, अपार्टमेंट ५, श्री दत्त कृपा, ९०८, जिमखाना, पुणे ४११००४, महाराष्ट्र, भारत.

दूरभाष/फॅक्सः ०२० २५६५४२३९

**ई मेलः**marathipaupdate@gmail.com

**संकेतस्थळः** http://kalpavriksh.org

***

टीपः ‘महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा’त प्रकाशित बातम्या या त्या त्या बातमीखाली दिलेल्या मूळ प्रकाशनातील बातम्यांवर संपादकीय सोपस्कार करून प्रकाशित केलेल्या आहेत.

***

‘महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा’च्या प्रकाशनासाठी अर्थसाहाय्य

**दुलीप मथ्थाई नेचर कॉन्झर्वेशन ट्रस्ट**

c/o फाऊण्डेशन फॉर इकॉलॉजिकल सेक्युरिटी http://fes.org.in/

आणि

**अनेक हितचिंतकांच्या वैयक्तिक देणग्या**

***

# संपादकीय

## 'वन्यजीव' नव्हे 'व्याघ्र' वृत्तांकन

आकर्षक फोटो आणि भडक मथळे असलेल्या बातम्या वाचकाचे लक्ष वेधून घेतात. वाघाविषयीच्या बातम्यांमध्ये या दोन्ही बाबींना भरपूर वाव असतो. म्हणूनच की काय मराठी वृत्तपत्रांमध्ये वाघाविषयीच्या वृत्तांकनाचे प्रमाण लक्षणीय आहे. ही वृत्तपत्रे 'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा'तील मजकुराचे स्रोत असल्याने त्यातील वृत्तांकनाचे प्रतिबिंब 'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा'तही पडलेले दिसून येते.

या वार्तापत्राच्या पहिल्या पाच अंकांमध्ये वाघाविषयीच्या बातम्यांचे प्रमाण सरासरी २०% आहे. प्रस्तुत अंकात २५% बातम्या वाघाविषयी आहेत.

वाघांची संख्या, बछड्यांचा जन्म, त्यांची आजारपणे, वाघांनी केलेली लांब पल्ल्याची स्थलांतरे, शिकार व तस्करी, प्राणिसंग्रहालयातील वाघ अशा बातम्यांमध्ये अलीकडे संरक्षित क्षेत्रांबाहेरील वाघ, त्यांचा मनुष्यवस्तीजवळ वाढलेला वावर, माणसांवर होणारे हल्ले, वाघांवर विषप्रयोग, वीजप्रवाहाचा प्रयोग अशा बातम्यांची भर पडली आहे.

महाराष्ट्रात जणू वाघ या एकमेव प्राण्याचे अस्तित्त्व धोक्यात आहे, असे या बातम्या पाहून वाटावे. वास्तविक वाघापेक्षा संरक्षण-संवर्धनाची गरज असलेल्या इतर प्रजातीही आहेत. माळढोक (ग्रेट इंडियन बस्टर्ड) पक्ष्यांची संख्या राज्यात एका हाताच्या बोटावर मोजण्याइतकी उरली आहे. खवलेमांजरा- (पँगोलीन)-च्या तस्करीचे प्रमाण वाघाच्या तस्करीहूनही जास्त आहे.

आता या वार्तापत्रातील बातम्यांच्या निवडीचा मुद्दा उपस्थित होतो. आमचे बातम्या निवडीचे निकष चुकत आहेत का; आम्हाला वाघ सोडून इतर बातम्या शोधता येत नाहीत का; आमचा दृष्टीकोन पूर्वग्रहदूषित आहे का; आमच्या मजकुराच्या स्रोतांची व्याप्ती मर्यादित असल्याचा हा परिणाम आहे का हे आणि असे प्रश्न वाचकांना पडणे साहजिक आहे. किंबहुना, हे प्रश्न आम्हालाही पडतात. खेरीज, अवघ्या पाच अंकांनंतर मराठी वृत्तपत्रांमधील वृत्तांकन व्याघ्रकेंद्रित आहे, असे म्हणणे योग्य ठरेल का, हा प्रश्नसुद्धा हे संपादकीय लिहिण्यापूर्वी पडला होता. म्हणून मग आमच्याकडे उपलब्ध असलेल्या स्रोताचा आधार घेतला. जवळपास गेली तीन दशके प्रकाशित होत असलेल्या वन्यजीवविषयक इंग्रजी बातम्यांचे द्वैमासिक 'प्रोटेक्टेड एरिआ (पी. ए.) अपडेट'मधील वृतांकनाचे विश्लेषण तपासून पाहिले.

'पी. ए. अपडेट'ची व्याप्ती देशभरातील संरक्षित क्षेत्रांपर्यंत विस्तारलेली आहे. त्यातील मजकुराच्या स्रोतांमध्ये राष्ट्रीय पातळीवरील वृत्तपत्रे व काही नियतकालांचा समावेश आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर दुर्मीळ मानल्या गेलेल्या सिंह, हत्ती, गेंडा, गंगेतील डॉल्फीन, समुद्री कासवे यांच्या संरक्षण-संवर्धनासाठी भारताच्या विविध राज्यांमध्ये दखलनीय प्रयत्न केले जात आहेत. त्या विषयीच्या बातम्या 'पी. ए. अपडेट'च्या स्रोतांमध्ये व पर्यायाने 'पी. ए. अपडेट'मध्येही येतात, हे एक. दुसरी बाब अशी की महाराष्ट्रात सिंह नाही, समुद्री कासवे ओदिशाच्या किनाऱ्यावर अंडी घालण्यासाठी ज्या संख्येने येतात त्या तुलनेत महाराष्ट्राच्या किनाऱ्यावर येणाऱ्या कासवांची संख्या किरकोळ आहे. हत्तीही दक्षिण कोकणात ठराविक भागापुरते मर्यादित आहेत. गेंडा व गंगेतील डॉल्फीन महाराष्ट्रात नाहीत.

या बाबी लक्षात घेता राष्ट्रीय पातळीवरील वृत्तांकन राज्य पातळीवरील वृत्तांकनापेक्षा वेगळे असेल, असे वाटले होते. मात्र 'पी. ए. अपडेट'च्या अंकांतही वाघांविषयी बातम्यांचे प्रमाण सरासरी २०% असल्याचे दिसून आले आहे.

भारताच्या वन्यजीव संरक्षण-संवर्धनविषयक धोरणाच्या केंद्रस्थानी वाघ आहे. कारण वाघ हा अन्नसाखळीतील सर्वोच्च घटक आहे. त्याचे अस्तित्त्व परिसरातील अन्नसाखळ्या, अधिवास व पर्यायाने परिसंस्थांचे आरोग्य सुस्थितीत असल्याचे दर्शवते. ताकदवान, देखणा प्राणी असल्याने वाघाला वन्यजीव धोरणाचा चेहरा म्हणून ठेवल्यास वन्यजीव संवर्धनाच्या महत्त्वाकडे जनतेचे लक्ष वेधून घेणे सोपे जाईल. वाघाचा दबदबा, त्याच्याविषयीचे आकर्षण विश्वव्यापी आहे. त्यामुळे व्याघ्रसंवर्धनासाठी पाठींबा, निधी मिळवणे सोपे आहे. ही कारणमीमांसा तर्कशुद्ध व व्यावहारिक आहे. पण मूळ हेतू असा आहे की वाघ हा निमित्तमात्र ठरावा; त्याचे संरक्षण-संवर्धन हे एकुणात पर्यावरणाचे संवर्धन व्हावे.

हा मूळ हेतू साध्य होतो आहे किंवा नाही हा वेगळा विषय आहे; त्याविषयी पुन्हा कधीतरी. दरम्यान, राज्य व राष्ट्रीय अशा दोन्ही पातळीवर वृत्तांकन मात्र वाघाभोवतीच फिरत राहिले आहे, याविषयी दुमत नसावे.

## संरक्षित क्षेत्रातील बातम्या

### कर्नाळा अभयारण्य

**मुंबई-गोवा महामार्गाच्या कर्नाळा अभयारण्यातून जाणाऱ्या टप्प्यात दुतर्फा ध्वनिरोधक**

मुंबई गोवा महामार्गाच्या कर्नाळा अभयारण्यातील टप्प्यात या रस्त्यावर दुतर्फा ध्वनिरोधक उभारण्यात आले आहेत. महामार्गावर मोठ्या प्रमाणावर रहदारी असते. यात अवजड वाहनांची संख्या मोठी असते. त्यांच्या आवाजाचा अभयारण्यातील वन्यजीवांवर परिणाम होऊ नये यासाठी ही उपाययोजना केली आहे.

महामार्गावर कर्नाळा खिंडीत रस्त्याच्या कडेला माकडे मोठ्या संख्येने बसलेली दिसतात. या माकडांना प्रवासी, वाहनचालक थांबून खाद्यपदार्थ देत असतात. सहज खाद्य उपलब्ध होत असल्याने माकडांचा महामार्गावरील वावर वाढत आहे. वन विभागाने वारंवार सूचना करूनही माकडांना खाद्यपदार्थ देण्याचे प्रमाण कमी झालेले नाही. तेव्हा या प्रकाराला आळा घालून अभयारण्यातील माकडांचा महामार्गावरील वावर कमी व्हावा, यासाठीही या उपाययोजनेची मदत होईल, अशी अपेक्षा आहे.

अभयारण्याच्या परिसरात महामार्ग रुंदीकरणाला परवानगी देतांना पर्यावरण विभागाने काही अटी आणि शर्ती घातल्या होत्या. त्यानुसार ही उपाययोजना करण्यात आली आहे.

**सूत्र** - हर्षद कशाळकर. 'कर्नाळा अभयारण्यालगत महामार्गाला ध्वनीरोधक यंत्रणेचे कवच', www.loksatta.com, ०५.०४.२०२१.




### कोका अभयारण्य

**कोका अभयारण्यातील वणव्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी उपाययोजना**

भंडारा जिल्ह्यात असलेल्या कोका अभयारण्यात दरवर्षी उन्हाळ्यात वणवे लागून वन्यजीवनाची हानी होते. या वर्षी उन्हाळा सुरू होताच वन्यजीव विभागाने वणवे नियंत्रणात ठेवण्यासाठी उपाययोजना केल्या आहेत.

वन्यजीवांवर लक्ष ठेवण्यासाठी व रेती तस्करीला आळा घालण्यासाठी अभयारण्यात वर्षभरापूर्वी कॅमेरे लावले होते. त्याच कॅमेऱ्यांचा वापर आता कृत्रिम वणवे लावणाऱ्यांना पकडण्यासाठी केला जाणार आहे. या खेरीज, जंगलात अग्नीरोधक पट्टे तयार करण्याचाही उपाययोजनांमध्ये समावेश आहे.

मधाची पोळी काढणे, मोहाची फुले, तेंदू पाने गोळा करण्यासाठी स्थानिक ग्रामस्थ जंगलात जातात तेव्हा अभयारण्यात कृत्रिम वणवे लावतात, असे दिसून आले आहे. अशा वेळी वणवा लागण्याची नेमकी कारणे शोधण्यासाठी कॅमेऱ्यांचा उपयोग होईल, असे वनाधिकाऱ्यांनी म्हटले आहे.

**सूत्र** – 'कोका अभयारण्यातील वणव्यांवर सीसीटीव्हीची नजर', www.lokmat.com, २८.०२.२०२१.

### गौताळा औट्रमघाट अभयारण्य

**तब्बल ८१ वर्षांनंतर गौताळा औट्रमघाट अभयारण्यात वाघाच्या अस्तित्त्वाची नोंद**

सन १९४० नंतर यंदा प्रथमच गौताळा औट्रमघाट अभयारण्यात वाघाच्या अस्तित्त्वाची नोंद झाली आहे. हा प्रौढ वाघ यवतमाळ जिल्ह्यातील टिपेश्वर अभयारण्यातून भक्ष्याच्या शोधात इथवर पोहोचला असावा, असा अंदाज वनाधिकाऱ्यांनी वर्तवला आहे. वाघाच्या अंगावरील पट्ट्यांच्या साहाय्याने वनाधिकाऱ्यांनी तो टिपेश्वरातील वाघ असल्याची खात्री करून घेतली आहे.

११ व १२ मार्च रोजी हा वाघ या परिसरात दिसला. त्यानंतर त्याची छबी १५ मार्च रोजी जंगलात लावलेल्या स्वयंचलित कॅमेऱ्यात दिसून आली. वाघाने इथे रानडुकराची शिकार केल्याचेही दिसून आले आहे. गौताळ्यात पुरेसे भक्ष्य उपलब्ध असल्याने तो इथे थांबेल, असे वनाधिकाऱ्यांना वाटत

आहे. अभयारण्य व्यवस्थापनाने या वाघावर लक्ष ठेवण्यासाठी सात चमू नेमले आहेत.

गौताळा परिसरातील वाघ १९४० नंतर नाहीसे झाले. दरम्यान, बिबट्यांची संख्या वाढली असून इथे सध्या २५ बिबटे असल्याचे विभागीय वनाधिकाऱ्यांनी सांगितले.

**सूत्र** – 'In a first since 1940, Tiger seen in Maharashtra's Guatala Autramghat sanctuary', www.hindustantimes.com, २०.०३.२०२१.

## चांदोली अभयारण्य

### चांदोली अभयारण्यातील पुनर्वसन रखडलेल्या गावांचे आंदोलन तात्पुरते स्थगित

चांदोली अभयारण्यातील मळे, कोळणे, पाथरपुंज या सातारा, सांगली, रत्नागिरी या तीन जिल्ह्यांच्या सीमेवरील गावांच्या पुनर्वसनाबाबत दिरंगाईविरोधात 'आता रडायचं नाही तर लढायचं' या आंदोलनाची प्रशासनाने दखल घेतली आहे. शासकीय अधिकाऱ्यांनी कामाचा आणि आंदोलनकर्त्यांच्या मागण्यांचा जलद गतीने व गांभीर्याने विचार करू, हे आश्वासन दिल्यामुळे ग्रामस्थांनी आंदोलन तात्पुरते स्थगित केले आहे.

१९८५ मध्ये चांदोलीला अभयारण्याचा दर्जा मिळाला. त्यानंतर २००४ मध्ये ते राष्ट्रीय उद्यान म्हणून घोषित करण्यात आले व २०१० मध्ये कोयना व चांदोली मिळून सह्याद्री व्याघ्र प्रकल्प म्हणून विशेष दर्जा प्राप्त झाला. मात्र, अभयारण्य झाल्यानंतर ३५ वर्षे उलटल्यानंतरही पुनर्वसन प्रक्रियेतील दिरंगाईने ग्रामस्थ त्रस्त आहेत. सरकारी पुनर्वसन प्रस्ताव आणि आंदोलकांच्या मागण्यांमध्ये मोठी तफावत असल्याने त्यांनी आंदोलन पुकारले.

पाटण तालुक्यातील २,५०० लोकसंख्या असलेल्या या गावांना रहिवास दाखला मिळविण्यासाठी एक आठवडा लागतो. हे लोक आपल्या पावसाळी शेतीत भात आणि नाचणीची पिके घेतात व रोजगारासाठी बाहेर जातात. वन्यप्राण्यांना मुक्त संचार करता यावा यासाठी शेतकऱ्यांवर वन खात्याची बंधने आहेत. शासकीय विकासकामे राबवण्यास बंदी आहे. ग्रामपंचायत आहे, परंतु मूलभूत सेवा नाहीत. पंचायत समिती, जिल्हा परिषदेच्या योजना मिळत नाहीत. घरकुल योजनांचा लाभ मिळत नाही. पूर्वी तिसरीपर्यंत शाळा होती. आता आठवीपर्यंत आहे, मात्र ती शिक्षकांच्या मर्जीनुसार भरते. इथे कोणी आजारी पडल्यास २५ किमी अंतरापर्यंत पाळणा अथवा डोलीत घालून न्यावे लागते.

अभयारण्य परिसरातील अनेक गावे, वाड्या, वस्त्यांचे सांगली, कोल्हापूर जिल्ह्यांत पुनर्वसन करण्यात आले. मात्र, पाटण तालुक्यातील तीन गावांचेच पुनर्वसन रखडले आहे. त्यामुळे या गावांनी पुन्हा आंदोलन पुकारले. गेल्या विधानसभा व लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार टाकूनदेखील त्यांची पुनर्वसनाची कामे रखडलेलीच राहिल्याने पुन्हा २५ जानेवारीपासून निषेध आंदोलन पुकारले होते.



**सूत्र -** विश्वास पवार. 'चांदोली अभयारण्यातील गावांचा पुनर्वसनासाठी प्रदीर्घ संघर्ष', www.loksatta.com, ०४.०२.२०२१.

## टिपेश्वर अभयारण्य

### पर्यटनाचे नियम मोडणारे टिपेश्वर अभयारण्यातील वाहनचालक व मार्गदर्शक निलंबित

टिपेश्वर अभयारण्यात पर्यटनादरम्यान नियम मोडून वाघाचा रस्ता अडवणारे वाहनचालक आणि त्यातील मार्गदर्शकांना निलंबित करण्यात आले आहे.

पर्यटकांना घेऊन २८ जानेवारी रोजी तीन जिप्सी वाहनांनी टिपेश्वर अभयारण्यात प्रवेश केला. पैकी एक वाहन उभे असताना त्यापासून ५० मी अंतर राखण्याचा नियम मोडून दुसऱ्या वाहनचालकाने आपले वाहन त्या वाहनाच्या जवळ उभे केले. तसेच, निर्धारित रस्ता सोडून बाजूला जंगलात वाहन नेले. तिसऱ्या जिप्सी चालकाने समोर वाघ दिसत असतानाही त्यापासून किमान अंतराची मर्यादा पाळली नाही आणि वाहन वाघाजवळ नेले. म्हणून तिन्ही वाहनांचे चालक व मार्गदर्शकांना विभागीय वनाधिकाऱ्यांनी निलंबित केले आहे.

**सूत्र** – 'वाघाचा रस्ता अडविणाऱ्या जिप्सीचालकांसह गाईडवर निलंबनाची कारवाई', www.lokmat.com, ३०.०१.२०२१.

## ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प

### कोरोनाचा प्रसार रोखण्यासाठी टाळेबंदीमुळे ताडोबा अंधारीतील पर्यटन बंद



ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात दरवर्षी कोट्यवधीचा महसूल पर्यटनातून गोळा होतो. पर्यटक मार्गदर्शक, वाहनचालक यांचा उदरनिर्वाह पर्यटनावर अवलंबून आहे. मात्र, गेल्या वर्षी टाळेबंदीमुळे पर्यटनाचा हंगाम रिकामा गेल्यानंतर यावर्षीही ऐन हंगामात टाळेबंदी झाली आहे. त्यामुळे सलग दुसऱ्या वर्षी कोट्यवधीचा फटका बसणार आहे.

जंगल पर्यटनासाठी पर्यटकांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे. अशा पर्यटकांना त्यांचे पैसे परत करण्यात येणार आहेत. ताडोबा अंधारी व्याघ्रप्रकल्पाने त्यासाठी हेल्पलाईन सुरू केली आहे. १५ एप्रिलपासून जंगल पर्यटन थांबणार असून सरकारच्या पुढील आदेशापर्यंत ते बंदच राहणार आहे.

विदर्भातील इतर व्याघ्र प्रकल्प आणि अभयारण्यांनाही ही बंदी लागू आहे.

**सूत्र** – 'विदर्भातील जंगल पर्यटन बंद', www.loksatta.com, १५.०४.२०२१.

### वाहनाच्या धडकेत ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील बिबट्याचा मृत्यू; वाहनचालक मद्यधुंद अवस्थेत

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील कक्ष क्रमांक १८४ मध्ये मोहर्ली-पद्मापूर मार्गावर २४ मार्च रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास एका भरधाव कारच्या धडकेत बिबट्याचा मृत्यू झाला.

गस्तीवरील वनकर्मचाऱ्यांना कक्ष क्रमांक १८४ मध्ये नर बिबट्या मृतावस्थेत आढळून आला व या ठिकाणापासून जवळच एका चारचाकी वाहनाचा अपघात झाल्याचेही दिसून आले. अपघातग्रस्त वाहनाची तपासणी केली असता, वाहनाच्या समोरील चाकांवर आणि बोनेटवर बिबट्याचे केस आढळले. शिवाय, वाहनचालक मद्यधुंद अवस्थेत होता. या वाहनातील सर्वजण गंभीर जखमी होते. त्यामुळे त्यांना स्थानिक खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

या अपघातामुळे ताडोबा प्रकल्पातील वन्यजीवांच्या सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. ताडोबा मार्गावर वन्यजीवांचा वावर, मद्यधुंद पर्यटक व त्यांच्या वाहनांचा अतिवेग वन विभागासाठी चिंतेची बाब ठरत आहे.

**सूत्र -** रवींद्र जुनारकर. 'ताडोबा: भरधाव कारच्या धडकेत बिबट्याचा मृत्यू', www.loksatta.com, २५.०३.२०२१.



### ताडोबा अंधारी आणि आर्वी क्षेत्रात दोन वाघांचा मृत्यू

चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या मोहर्ली बफर वनपरिक्षेत्रात अर्जुनी गावालगत शेतात वाघ मृतावस्थेत आढळला. वर्धा जिल्ह्यातील आर्वी वनपरिक्षेत्रात ब्राह्मणवाडी बफर परिसरातही वाघीण मृतावस्थेत आढळून आली. फेब्रुवारी महिन्याच्या सुरुवातीला हे व्याघ्रमृत्यू झाले. ताडोब्यातील वाघाचा मृत्यू दोन वाघांच्या झुंजीत आणि ब्राह्मणवाडी इथे वाघिणीचा नैसर्गिक मृत्यू झाल्याचे समोर आले आहे.

ताडोब्यातील घटनेत मृत्यू झालेला वाघ तीन वर्षांचा नर असून त्याचे सर्व अवयव शाबूत असल्याची माहिती प्रकल्पाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. भानुसखिंडी इथे वाघाचे शवविच्छेदन करण्यात आले. मृत वाघाच्या मानेवर, तोंडावर, पाठीवर व पाठीमागील डाव्या पायावर जखमेचे व्रण दिसून आले आहेत. वाघाचा मृत्यू हा दोन वाघांच्या झुंजीत झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

आर्वी वनपरिक्षेत्रातील घटनेत वाघीण जिथे मृतावस्थेत आढळली त्या परिसरात दूरपर्यंत कुठलेही जनावर दिसून आले नाही. याशिवाय तारेचे कुंपण अथवा शेतदेखील जवळ नव्हते. गावापासून तीन किलोमीटर लांब असलेल्या जंगल शिवारात वाघिणीचा मृतदेह आढळला. वाघिणीचे शवविच्छेदन करण्यात आले. तिचे वय पाचसहा वर्षे असावे असा अंदाज आहे. तिचा नैसर्गिक मृत्यू झाला असावा, अशी शक्यता जिल्हा वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

**सूत्र** – 'दोन वाघ मृतावस्थेत आढळले', maharashtratimes.com, १०.०२.२०२१.

## तुंगारेश्वर अभयारण्य

### सतत लागणाऱ्या आगींमुळे तुंगारेश्वर अभयारण्यासह भोवतालचे वन्यजीवन धोक्यात



वसई पूर्वेकडील भागात जंगलपट्ट्याला एकापाठोपाठ एक आगी लागण्याचे प्रकार गेल्या काही दिवसांपासून सुरू आहेत. यातील काही भाग तुंगारेश्वर अभयारण्यात येतो तर काही भाग मांडवी वनपरिक्षेत्रात येतो.

१२ मार्च रोजी रात्री वसई पूर्वेतील सातीवली खिंडीतील जंगलपट्ट्याला भीषण आग लागली. तत्पूर्वी ९ मार्च रोजी तुंगारेश्वर अभयारण्यातील नागले ते पाये इथल्या डोंगराला आग लागली होती. ती घटना ताजी असताना तीनच दिवसांनी सातीवली इथे जंगलाला आग लागली. जंगलात सुकलेले गवत असल्याने आग वेगाने पसरत होती. नागरिकांनी वसई विरार महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाला याची माहिती दिली. माहिती मिळताच अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळविण्याचे काम सुरू केले. परंतु आगीची भीषणता अधिक असल्याने मोठ्या प्रमाणात जंगलपट्टा आगीत जळून खाक झाला.

सातत्याने लागणाऱ्या आगीच्या घटनांमुळे शिकारी करण्यासाठी अशा प्रकारच्या आगी लावल्या जात असल्याची शंका असल्याचे वृत्तात म्हटले आहे.

**सूत्र -** 'सातीवली खिंडीतील जंगलाला भीषण आग', www.loksatta.com, १३.०३.२०२१.

## नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प

### नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पात वणवा विझवताना तीन वनमजुरांचा मृत्यू, दोन जखमी

नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पातील नागझिरा व पिटेझरी वनपरिक्षेत्रात ९ एप्रिल रोजी लागलेल्या आगीत तीन हंगामी वनमजुरांचा होरपळून मृत्यू झाला व दोन वनमजूर गंभीर जखमी झाले.

वणवा विझवण्यासाठी वापरण्यात येणारे 'फायर ब्लोअर' फुटल्यामुळे ही घटना घडल्याचे प्रत्यक्षदर्शी वनमजुरांचे म्हणणे आहे. वन विभागात गेल्या काही वर्षांपासून वणवा विझवण्यासाठी 'फायर ब्लोअर'चा वापर केला जातो. हंगामी वनमजूर या उपकरणाच्या सहाय्याने वणवा विझवण्यासाठी जातात, पण हे उपकरण हाताळण्याचे प्रशिक्षण त्यांना दिले जात नाही.

नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पाच्या गाभा क्षेत्रातील आग विझवायला गेलेल्या वनमजुरांना हे उपकरण हाताळण्याचे प्रशिक्षण दिले नव्हते, त्यांना विमा सुरक्षा कवचही दिले नव्हते. आगीची झळ बसू नये याकरता त्यांना गणवेशही दिला नव्हता. ४०६ रुपये रोजंदारीवर हे हंगामी वनमजूर काम करत होते. हे उपकरण हाताळण्याचा कोणताही अनुभव नसताना पाठीवर 'फायर ब्लोअर' घेऊन ते वणवा विझवण्यासाठी गेले. या उपकरणात पेट्रोल किंवा डिझेलचा वापर होतो आणि आगीच्या संपर्कात आल्यामुळे ते फुटले. मात्र, प्रकल्प प्रशासनाने ही बाब नाकारली आहे.

मृत मजुरांच्या वारसांना प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत व जखमी वनमजुरांच्या उपचाराचा खर्च राज्य सरकार करणार आहे. या खेरीज, दोन स्वयंसेवी संस्थांनीही आर्थिक मदत जाहीर केली आहे.

**सूत्र -** 'तीन वनमजुरांचा मृत्यू', www.loksatta.com, १०.०४.२०२१.

### रेल्वेच्या धडकेत नागझिरा अभयारण्यातील वाघाचा मृत्यू

गोंदिया-चंद्रपूर रेल्वेमार्गावर गराडा गावाजवळ मालगाडीची धडक बसल्याने नागझिरा अभयारण्यातील १२ ते १५ महिन्यांच्या नर वाघाचा मृत्यू झाला. ८ मार्च रोजी हा अपघात झाला.

मृत वाघाचा पुढचा उजवा पाय तुटल्याचे दिसून आले. अपघात स्थळी हा पाय सापडला नव्हता. मात्र, प्रशिक्षित कुत्र्यांच्या साहाय्याने वन विभागाने तपास करून दोन रेल्वे कर्मचाऱ्यांना ताब्यात घेतले. या दोघांकडे मृत वाघाचा कापलेला पाय मिळाला.

मृत वाघ टी-१४ या वाघिणीच्या बछड्यांपैकी हा एक होता. टी-१४ वाघिणीने गेल्या दोन-तीन वर्षांपासून या भागात हद्द प्रस्थापित केली आहे.

गोंदिया-चंद्रपूर रेल्वेमार्ग अभयारण्याच्या लगत असल्याने वन्यजीवांचा या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वावर असतो. तरीदेखील वन्यजीव विभाग, वन विभाग व रेल्वेकडून इथे कोणतीही उपाययोजना करण्यात आलेली नाही.

**सूत्र** – मनेश्वर कुकडे. 'मृत वाघाचा बेपत्ता झालेला पाय सापडला, दोन रेल्वे कर्मचाऱ्यांना अटक', www.esakal.com, १०.०३.२०२१.
विवेक देशपांडे. 'Maharashtra: Sub-adult male tiger found dead on railway track passing through Navegaon-Nagzira Reserve', www.indianexpress.com, ०९.०३.२०२१.
'रेल्वेने दिलेल्या धडकेत वाघिणीच्या बछड्याचा मृत्यू', www.loksatta.com, ०८.०३.२०२१.

## नांदुरमधमेश्वर अभयारण्य

### पक्षीगणनेत नांदुरमधमेश्वर अभयारण्यात दहा हजारांहून अधिक पक्ष्यांची नोंद



नांदुरमधमेश्वर पक्षी अभयारण्यात यंदा मार्चअखेरीस झालेल्या पक्षीगणनेत १०,३४७ पक्षी दिसून आले. वनाधिकारी-कर्मचारी, स्थानिक मार्गदर्शक, पक्षीमित्र, वन्यजीव अभ्यासक, स्वयंसेवक यांच्या मदतीने ही गणना पूर्ण करण्यात आली.

चापडगाव, मांजरगाव, खानगावथडी, मधमेश्वर गोदावरी नदीपात्र, कोठुरे, कुरुडगाव, काथरगाव अशा सात ठिकाणी पक्षीनिरीक्षण करण्यात आले. एकूण ५७ प्रजातींचे ९,२८५ पाणपक्षी आणि १,०६२ झाडांवरील, गवताळ भागातील पक्षी याप्रमाणे १० हजार ३४७ पक्ष्यांची नोंद करण्यात आली.

**सूत्र** – 'नांदुरमधमेश्वरात १० हजारपेक्षा अधिक पक्ष्यांची नोंद', www.loksatta.com, ०२.०४.२०२१.

## पेंच व्याघ्र प्रकल्प

### पिंजऱ्यातून पेंच व्याघ्र प्रकल्पात सोडलेल्या वाघिणीचा मृत्यू

पेंच व्याघ्र प्रकल्पातील खुल्या पिंजऱ्यातून नैसर्गिक अधिवासात सोडलेल्या आणि दुसऱ्या वाघिणीशी झालेल्या लढाईत जखमी झाल्यानंतर पुन्हा पिंजऱ्यात घेतलेल्या वाघिणीचा १३ मार्च रोजी मृत्यू झाला.

अवनी वाघिणीला ठार केल्यानंतर तिच्या मादी बछड्याला पेंच व्याघ्र प्रकल्पातील खुल्या पिंजऱ्यात ठेवण्यात आले होते. या बछड्याला शिकारीसाठी प्रशिक्षित करून मोठे झाल्यानंतर जंगलात सोडण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार ५ मार्च रोजी रेडिओ कॉलर लावून पेंच व्याघ्र प्रकल्पात तिला सोडण्यात आले. मात्र दुसऱ्या वाघिणीशी अधिवासाच्या लढाईत ती जखमी झाली. तिच्या उजव्या पायाला जखम झाल्याने पुन्हा पिंजऱ्यात घेण्यात आले.

त्रितलमांगी इथे तिच्यावर एका बंदिस्त पिंजऱ्यात पशुवैद्यकांच्या देखरेखीखाली उपचार सुरू होते. मात्र, १३ मार्च रोजी सायंकाळी मादी बछड्याची तब्येत खालावल्याने तिला गोरेवाडा येथे हलवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या दृष्टीने हालचाली सुरू झाल्या. दरम्यान रात्री १० वाजताच्या सुमारास तिचा मृत्यू झाला, अशी माहिती पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या क्षेत्र संचालकांनी दिली.

**सूत्र** – 'पेंच व्याघ्र प्रकल्पात नैसर्गिक अधिवासात सोडलेल्या वाघिणीचा मृत्यू', www.loksatta.com, १४.०३.२०२१.

## मेळघाट व्याघ्र प्रकल्प

### उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच मेळघाटात तीव्र पाणीटंचाई

मेळघाट व्याघ्र प्रकल्पात पाण्याचे नैसर्गिक स्रोत आटले आहेत व त्याचबरोबर कृत्रिम पाणवठेही कोरडे पडले आहेत त्यामुळे तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे. पाण्याच्या शोधात भटकंती करणाऱ्या एका नीलगायीचा २३ मार्च रोजी मृत्यू झाल्याचे दिसून आले आहे.

सिपना व गडगा या नद्या आणि त्यांना येऊन मिळणारे लहानमोठे ओहोळ मेळघाटातील जलवाहिन्या म्हणून ओळखले जातात. मात्र या नदीनाल्यांमध्ये पाणी अडवण्याची कोणतीही उपाययोजना केलेली नाही. हतरू, रायपूर, चौराकुंड,

हरिसाल व ढाकणा क्षेत्रात पाण्याअभावी दरवर्षी भीषण टंचाई निर्माण होते.

पाणीटंचाईवर मात करण्यासाठी इथे नियोजनाची गरज आहे. व्याघ्र प्रकल्पातून वाहणाऱ्या नद्यानाल्यांचे पाणी जंगलातच अडवण्याचे नियोजन करावे व पाणीटंचाईवर मार्ग काढावा, अशी वन्यजीवप्रेमींची मागणी आहे. शासनाच्या रोजगार निर्मिती योजना व पाण्याचे नियोजन यांची सांगड घालून इथल्या स्थानिक जनतेला रोजगाराच्या संधीही मिळवून देता येतील, असाही विचार वन्यजीवप्रेमींनी मांडला आहे.

**सूत्र** – राज इंगळे. 'नैसर्गिक स्रोत आटले, कृत्रिम पाणवठे झाले कोरडे; मेळघाटात पाणीटंचाईच्या झळा', www.esakal.com, ३१.०३.२०२१.

**वणव्यात मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील जवळपास ४० हेक्टर जंगल भस्मसात**



मेळघाट व्याघ्र प्रकल्पात खोंगडा मंडळांतर्गत येणाऱ्या चार वनखंडांत लागलेल्या आगीत ३०-४० हेक्टर जंगल जळून खाक झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

वनखंड ९४२, ९४३, ९४९, ९५० मध्ये मार्च अखेरीस वणवा पेटला. मोहफुले वेचण्यासाठी लावलेली आग जंगलात पसरून हा वणवा पेटल्याची शक्यता वृत्तात व्यक्त केली आहे. जामली व चिखलदरा वनपरिक्षेत्रातील वनकर्मचाऱ्यांनी रात्रभर प्रयत्न करून आग आटोक्यात आणली. तरीदेखील या आगीत जवळपास ४० हेक्टर जंगल जळाल्याचा अंदाज आहे.

**सूत्र** – मोहन गायन. 'मेळघाटातील जंगलाला आग, तीस हेक्टर सेक्टर जळून खाक', www.esakal.com, ३१.०३.२०२१.

**अपुऱ्या मनुष्यबळामुळे मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील कर्मचाऱ्यांवर ताण**

मेळघाट व्याघ्र प्रकल्पात उपवनसंरक्षकापासून ते वनरक्षकापर्यंत एकूण १२२८ पदे मंजूर असताना सद्यस्थितीत १,०५५ कर्मचारीच कार्यरत असून वनरक्षकांची पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त आहेत. सध्या प्रकल्पाच्या क्षेत्रात विभागीय वनाधिकाऱ्याचे एक पद रिक्त आहे. साहाय्यक वनसंरक्षकांची पाच पदे रिक्त आहेत. यांसह वनक्षेत्रपालांची सहा अशी वर्ग-१ आणि २ च्या अधिकाऱ्यांची एकूण १२ पदे अजूनही भरली गेलेली नाहीत. दुसरीकडे, वनपालांची ३४, वनरक्षकांची ५१, वननिरीक्षकांची पाच अशी वर्ग-३ मधील १२७ पदे रिक्त आहेत. वर्ग-४ मधील ३४ पदांवर गेल्या अनेक वर्षांत नियुक्या झालेल्या नाहीत.

मेळघाट व्याघ्र प्रकल्प हा डोंगराळ आणि दुर्गम भागात पसरलेला असल्याने इथल्या नियतक्षेत्रांची पुनर्रचना केली जावी, अशी मागणी अनेक वर्षांपासून होत आहे. या ठिकाणी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी चांगल्या निवासाच्या सोयी, वणवा नियंत्रण व शिकार रोखण्यासाठी आधुनिक साधने पुरवली जावीत, अशीही कर्मचारी संघटनांची मागणी आहे. पण, याबाबतीत फारशा हालचाली झालेल्या नाहीत. मेळघाट म्हणजे शिक्षा समजून अधिकारी आणि कर्मचारीही या भागात सेवा देण्यास सहजासहजी तयार होत नाहीत. कामाच्या ठिकाणी असलेली असुरक्षितता, कार्यक्षेत्राचा मोठा विस्तार, जबाबदारीचे मोठे ओझे यामुळे कामाचा ताण वाढल्याचे कर्मचारी सांगतात.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या हद्दीतील गावांच्या पुनर्वसनाची प्रक्रिया गेल्या अनेक वर्षांपासून सुरू आहे. प्रत्यक्ष पुनर्वसनाचे काम हे महसूल विभागाचे. पण ते लक्ष देत नाहीत म्हणून मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांनीच सर्व जबाबदारी शिरावर घेतल्याने वनाधिकाऱ्यांवर त्याचाही ताण असल्याचे वृत्तात नमूद केले आहे.

**सूत्र -** मोहन अटाळकर. 'मेळघाटात वन कर्मचाऱ्यांवर ताण', www.loksatta.com, ३१.०३.२०२१.

**वनक्षेत्रपाल आत्महत्या प्रकरणी उपवनसंरक्षकासह मेळघाट प्रकल्पाचे क्षेत्र संचालक निलंबित**

मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत गुगामल वन्यजीव विभागातील हरिसाल वनपरिक्षेत्राच्या वनक्षेत्रपाल दीपाली चव्हाण यांनी मार्च अखेरीस आत्महत्या केली. या प्रकरणी उपवनसंरक्षक विनोद शिवकुमार यांना अमरावती पोलिसांनी नागपुरातून अटक केली. मृत्यूपूर्व पत्रात चव्हाण यांनी शिवकुमार यांच्या त्रासाला कंटाळून

आत्महत्या करत असल्याचा उल्लेख केला आहे. चव्हाण यांच्या आत्महत्येची सखोल चौकशी करण्याची मागणी महाराष्ट्र रेंजर फॉरेस्ट असोसिएशनसह विविध संघटनांनी केली आहे.

शिवकुमार याच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी चव्हाण यांचे पती राजेश मोहिते यांनी केली आहे. शिवकुमार दीपालीला प्रचंड त्रास द्यायचे. ती वारंवार माझ्याकडे सांगायची; पण तिची दखल वरिष्ठ अधिकारी घेत नव्हते. तिच्यावर अनुसूचित जाती/ अनुसूचित जमातींवरील अत्याचार प्रतिबंध कायद्यांतर्गत खोटा गुन्हाही दाखल करण्यात आला होता, असे राजेश मोहिते यांचे म्हणणे आहे.

दरम्यान, शिवकुमार यांना शासनाने तात्काळ निलंबित केले; तर मेळघाट प्रकल्पाचे क्षेत्र संचालक श्रीनिवास रेड्डी यांची नागपूर मुख्यालयात बदली करण्यात आली होती. मात्र, ३० मार्चच्या वृत्तानुसार, त्यांनाही निलंबित करण्यात आले आहे.

**सूत्र -** 'वन अधिकारी दीपाली चव्हाण आत्महत्या प्रकरणात एम एस रेड्डी निलंबित!', www.loksatta.com, ३०.०३.२०२१.
'वरिष्ठाच्या छळाला कंटाळून महिला वनाधिकाऱ्याची आत्महत्या!', www.loksatta.com, २७.०३.२०२१.

**मेळघाटात 'स्केली थ्रश' पक्ष्याचे दर्शन; छायाचित्रासह पहिलीच नोंद**

मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील पूर्व धारगड वनक्षेत्रामध्ये 'ठिपकेदार कस्तूर' या पक्ष्याची नोंद करण्यात आली आहे. या पक्ष्याचे इंग्रजी नाव 'स्केली थ्रश' व शास्त्रीय नाव 'झूथेरा डॉमा' असे आहे.

अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयातील अधिकाऱ्यांना मनोज बिंड या पक्षीनिरीक्षकासह ७ मार्च रोजी मेळघाटात भ्रमंती करताना हा पक्षी आढळून आला. ई-बर्ड संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या माहितीनुसार, या पक्ष्याची छायाचित्रासह खात्रीशीर अशी महाराष्ट्रातील ही पहिलीच नोंद ठरल्याचा दावा पक्षीनिरीक्षकांनी केला आहे.

**सूत्र -** ''ठिपकेदार कस्तूर' पक्ष्याची महाराष्ट्रात प्रथमच नोंद', www.loksatta.com, ०९.०३.२०२१.

**तीन वर्षांत मृत वाघ सापडल्याची मेळघाटातील पाचवी घटना; सीबीआय चौकशीची मागणी**

मेळघाट व्याघ्र प्रकल्पात २० जानेवारी रोजी पहाटे गस्तीदरम्यान वनकर्मचाऱ्यांना नर वाघाचा मृतदेह आढळला होता, त्या वाघाचा मृत्यू त्या आधी पाचसहा दिवसांपूर्वी झाल्याचे प्राथमिक शवविच्छेदनात स्पष्ट झाले आहे. सिपना वन्यजीव विभागांतर्गत रायपूर वन परिक्षेत्रातील माडीझडप नियतक्षेत्रात हा मृतदेह दिसून आला होता. तो कुजलेल्या अवस्थेत होता. शवविच्छेदनानंतर डॉक्टरांच्या चमूने आवश्यक नमुने पुढील तपासणीसाठी अमरावती व हैदराबाद इथल्या प्रयोगशाळांमध्ये पाठविले आहेत.

दरम्यान, मेळघाटातील वाघांच्या मृत्यूच्या घटनांची केंद्रीय तपास संस्थे (सीबीआय) कडून चौकशी केली जावी, अशी मागणी वन्यजीवप्रेमींनी केली आहे. माडीझडपमधील घटनेसह अशा घटना मेळघाट व्याघ्र प्रकल्पात गेल्या तीन वर्षांत पाच वेळा घडल्या आहेत.

एप्रिल २०१८ मध्ये ढाकणा वन परिक्षेत्रातील भांडूम नियतक्षेत्रात कपूरखेडा नाला इथे मृत्यूनंतर नऊ दिवसांनी वाघाचा मृतदेह आढळला होता. जानेवारी २०१९ मध्ये चिखलदरा वन परिक्षेत्रातील मोथा परिसरात वाघाचा मृतदेह त्याच्या मृत्यूनंतर १५ दिवसांनी आढळून आला होता. आकोट वन परिक्षेत्रातील जीतापूर नियतक्षेत्रात टी-३५ वाघिणीचा मृतदेह तिच्या मृत्यूनंतर सहा दिवसांनी ३ मार्च २०१९ रोजी आढळला होता. एप्रिल २०२० मध्ये अंबाबरवामधील टी-२३ वाघाचा मृतदेह त्याच्या मृत्यूनंतर १५ दिवसांनी राज्याच्या सीमेपलीकडे मध्य प्रदेशाच्या हद्दीतील जंगलात आढळला होता.

ओळख पटलेल्या मृत वाघांच्या शरीरातील नमुने चाचण्यांसाठी प्रयोगशाळांमध्ये पाठवले जातात. मात्र, त्यानंतर ही प्रकरणे कागदोपत्री बंद होतात. त्यांचे पुढे काहीच होत नाही.

मेळघाट प्रकल्पात २०१८ मध्ये उघडकीस आलेल्या एका शिकारीच्या गुन्ह्यातील आरोपींनी २०१७-१८ या वर्षांत चार वाघ आणि एका बिबट्याची शिकार केल्याची कबुली दिली. मात्र, या प्रकरणी पुढे चौकशी झाली नाही.

व्याघ्र प्रकल्पालगत असलेल्या प्रादेशिक वन विभागाच्या जंगलातही वाघ आहेत. मात्र, या वाघांना ओळख नाही. मोथा व माडीझडप प्रकरणातील वाघ असे बिनओळखीचे

आहेत. अशा प्रकरणांचे पुढे काय असे प्रश्न उपस्थित झाले आहेत. त्यामुळे मेळघाटातील वाघांच्या मृत्यू प्रकरणांची चौकशी सीबीआयकडे सोपवण्यात यावी, अशी वन्यजीवप्रेमींची मागणी आहे.

**सूत्र** – अनिल कडू. 'मेळघाटातील वाघांची सुरक्षा दुर्लक्षित, सीबीआय चौकशी का नाही?', www.lokmat.com, २८.०१.२०२१.
'मेळघाटातील त्या वाघाचा मृत्यू पाच दिवसांपूर्वीचा; अहवालात स्पष्ट', www.lokmat.com, २५.०१.२०२१.

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यान

### संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील पुनर्वसन प्रकरणी न्यायालयाचे सरकारवर ताशेरे



संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील पात्र अतिक्रमितांचे चांदिवली इथे पुनर्वसन करण्यात आले होते मात्र, झोपडपट्टी पुनर्वसन (झोपु) योजनेअंतर्गत दिलेली घरे त्यांनी विकल्याची गंभीर दखल उच्च न्यायालयाने घेतली. हा प्रकार उघड होऊन सहा वर्षे उलटल्यावरही काहीच कारवाई न करणाऱ्या राज्य सरकारच्या भूमिकेवर न्यायालयाने प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील पात्र अतिक्रमितांचे चांदिवली इथे पुनर्वसन करताना त्यांच्याकडून सात हजार रुपये घेण्यात आले होते. तसेच १० वर्षे त्यांना ही घरे विकता येणार नाहीत, अशी अट घालण्यात आली होती. त्यानंतरही त्यांनी ही घरे विकल्याची बाब 'जनहित मंच' या संस्थेने जनहित याचिकेद्वारे उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली होती.

या याचिकेची दखल घेत उच्च न्यायालयाने २०१५ मध्ये झोपु प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी, वनाधिकारी आणि पोलीस यांनी संयुक्तपणे याप्रकरणी पाहणी करून पुनर्वसितांपैकी किती जणांनी घरे विकली, त्यांच्यावर काय कारवाई केली याचा अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते.

या वर्षी जानेवारी अखेरीस झालेल्या सुनावणीत २०१५ च्या आदेशाकडे लक्ष वेधत पाहणीचा आणि कारवाईचा अहवाल अद्याप का सादर करण्यात आलेला नाही, अशी विचारणा न्यायालयाने सरकारी वकिलांकडे केली. तसेच सरकारच्या भूमिकेविषयी नाराजी व्यक्त केली. अतिक्रमण करणाऱ्यांचे पुनर्वसन करण्यासाठी सरकार राखीव जागेचे आरक्षण बदलते. पण पुनर्वसित अतिक्रमित त्यांना दिलेली घरे विकून पुन्हा दुसरीकडे सरकारी जागेवर अतिक्रमण करतात. पुन्हा सरकार त्यांचे पुनर्वसन करते, हे सुरूच आहे.

शिवाय या पात्र अतिक्रमितांकडून घरे खरेदी करणाऱ्यांवर अन्याय होऊ नये म्हणून त्यांच्यावरही कारवाई न करण्याचा निर्णय सरकारने घेतला. अतिक्रमण करणाऱ्यांना सरकारकडून अतिरिक्त बक्षीस मिळते, तर कायद्याचे पालन करणाऱ्यांना घर खरेदी करणे दिव्य होऊन बसते, अशी टीप्पणी न्यायालयाने केली.

तसेच आतापर्यंत किती अतिक्रमित पुनर्वसितांनी झोपु योजनेअंतर्गत उपलब्ध घरे विकली, त्यांच्यावर काय कारवाई केली याचा अहवाल सादर करण्याचे आदेश न्यायालयाने झोपु प्राधिकरणाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिले.

**सूत्र -** 'सरकार अतिक्रमण करणाऱ्यांच्याच बाजूने', www.loksatta.com, २८.०१.२०२१.

## राज्यस्तरीय बातम्या

### राज्यात यंदा तीन महिन्यांत ११ वाघांचा; तर देशात ३९ वाघांचा मृत्यू

भारतात २०२१ च्या सुरुवातीला तीन महिन्यातील वाघांच्या एकूण मृत्यूंपैकी सर्वाधिक ६४ टक्के मृत्यू मध्य भारतात झाले आहेत. यातील ४१ टक्के मृत्यू हे एकट्या महाराष्ट्रात; तर २३ टक्के मृत्यू मध्य प्रदेशातील आहेत.

'क्लॉ' या संस्थेकडून दरवर्षी संपूर्ण भारतातील वाघांच्या मृत्यूची आकडेवारी दिली जाते. या आकडेवारीनुसार, दर दोन दिवसात एक वाघ मृत्युमुखी पडत आहे. यावर्षी पहिल्या तीन महिन्यातच संपूर्ण भारतात ३९ वाघ मृत्युमुखी पडले.

देशात दर चार वर्षांनी होणाऱ्या व्याघ्रगणनेत वाघांची संख्या वेगाने वाढत असल्याचे समोर आले आहे. मात्र, त्याचवेळी गेल्या तीन वर्षांतील वाघांच्या मृत्यूची आकडेवारीही तितकीच मोठी आहे. २०१८ पासून आतापर्यंत भारतात ३०३ वाघ मृत्युमुखी पडले आहेत. यातील सर्वाधिक ८८ मृत्यू मध्य प्रदेशात, ५५ मृत्यू महाराष्ट्रात तर ३९ मृत्यू कर्नाटकात झाले आहेत.

राज्यनिहाय व्याघ्रमृत्यूंची टक्केवारी

| राज्य | व्याघ्रमृत्यूची टक्केवारी |
|---|---|
| महाराष्ट्र | ४१ |
| मध्य प्रदेश | २३ |
| उत्तराखंड | १३ |
| उत्तर प्रदेश | १३ |
| बिहार | ३ |
| केरळ | ३ |
| असम | ३ |
| कर्नाटक | ३ |

महाराष्ट्रात या तीन महिन्यांत ११ वाघांचा मृत्यू झाला आहे. राज्यातील वाघांच्या एकूण मृत्यूंपैकी ५० टक्क्याहून अधिक मृत्यू शिकारीकडे अंगुलीनिर्देश करणारे आहेत. प्रादेशिक विभागाअंतर्गतही वाघांच्या मृत्यूची प्रकरणे समोर येत आहेत.

वाघांच्या मृत्यूप्रकरणातील ५५ प्रकरणे शिकारीची आहेत. २७ प्रकरणांत वाघांचे अवयव सापडले असून १०५ प्रकरणांची अजूनही चौकशी सुरू आहे.

महाराष्ट्रात नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी उमरेड कऱ्हांडला अभयारण्यात वाघिणीचा गर्भातील तीन बछड्यांसह मृत्यू, २१ जानेवारीला मेळघाट व्याघ्र प्रकल्पात वाघिणीचा मृत्यू, २७ जानेवारीला चंद्रपूर जिल्ह्यातील भद्रावती वनक्षेत्रात वाघाचा मृत्यू झाला.

फेब्रुवारी महिन्यातही वाघांच्या मृत्यूची दोन प्रकरणे समोर आली. आठ फेब्रुवारीला वर्धा जिल्ह्यात, नऊ फेब्रुवारीला ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात वाघाचा मृत्यू झाला.

पेंच व्याघ्र प्रकल्पातील अवनीचा बछडा, उमरेड कऱ्हांडला अभयारण्यातील दोन बछड्यांपाठोपाठ वर्धा जिल्ह्यात केळझरजवळ नाल्यात एका वाघाचा असे मृत्यू झाले आहेत.

वर्षनिहाय महाराष्ट्रातील व्याघ्रमृत्यूंची आकडेवारी

| वर्ष | व्याघ्रमृत्यू |
|---|---|
| २०१८ | १९ |
| २०१९ | २२ |
| २०२० | १६ |
| २०२१ (२३ मार्चपर्यंत) | ११ |

**सूत्र** – 'भारतात सर्वाधिक ४१ टक्के वाघांचे मृत्यू महाराष्ट्रात', www.loksatta.com, २६.०३.२०२१.
राजेश रामपूरकर. 'धक्कादायक! अधिवासाच्या लढाईत संपताहेत वाघ, तीन महिन्यांत ११ वाघांचा मृत्यू', www.esakal.com, २३.०३.२०२१.
'राज्यात दोन महिन्यांत पाच वाघांची शिकार', www.loksatta.com, २३.०२.२०२१.

**राज्यात माणूस-वन्यजीव संघर्षात गेल्या चार वर्षांत २१४ माणसे ठार**

राज्यात गेल्या चार वर्षांत वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात २१४ माणसांचा बळी गेला असून या मानवी मृत्यूच्या नुकसानभरपाईपोटी वन विभागाने तब्बल २६ कोटी चार लाख रुपये दिले आहेत.

चार वर्षांत वाघाच्या हल्ल्यात १०१ माणसे मृत्युमुखी पडली. त्यातील सर्वाधिक ३८ माणसांचा बळी २०२० मध्ये गेला. १२ कोटी ३७ लाख रुपये वन खात्याने नुकसानभरपाईपोटी दिले. बिबट्याच्या हल्ल्यात ६४ माणसे मृत्युमुखी पडली. त्यातील सर्वाधिक ३२ माणसांचा बळी २०२० मध्येच गेला. वन खात्याने आठ कोटी ३० लाख रुपये नुकसानभरपाई दिली.

माहिती अधिकार कार्यकर्ते अभय कोलारकर यांनी माहिती अधिकाराअंतर्गत विचारलेल्या माहितीत ही आकडेवारी समोर आली आहे. या चार वर्षांत २०२० हे वर्ष वन खात्यासाठी सर्वाधिक अडचणीचे ठरले. कारण मानव-वन्यजीव संघर्षांचा आलेख या वर्षांत झपाट्याने वाढला आहे. वाघ आणि बिबट्याचे सर्वाधिक हल्ले याच वर्षात झाले. हा संघर्ष माणसांसोबतच वन्यप्राण्यांसाठीही कर्दनकाळ ठरला आहे. संघर्षातून मानवी हल्ले झाले आणि गावकऱ्यांचा दबाव वाढला की खात्याकडून थेट त्याला पकडण्याचे, नाही तर गोळी घालून ठार मारण्याचे आदेश देण्यात येतात. मानवी मृत्यू झाला की कुटुंबियांना नुकसानभरपाई देण्यात येते. या दोन्ही प्रक्रियेत खात्याचीच तिजोरी रिकामी होत आहे, पण वन खात्याला हा

संघर्ष थांबवण्यात अपयश आले आहे. २०२० या एका वर्षात वाढलेल्या संघर्षांमुळे पुन्हा एकदा वन खात्याची कार्यशैली चर्चेचा विषय ठरली आहे.

| वर्ष | मृत्यू | नुकसानभरपाई |
|---|---|---|
| २०१७ | ५४ | चार कोटी ३२ लाख रुपये |
| २०१८ | ३३ | तीन कोटी १२ लाख रुपये |
| २०१९ | ३९ | पाच कोटी ८५ लाख रुपये |
| २०२० | ८८ | १२ कोटी ७५ लाख रुपये |

दरम्यान, वर्धा वन परिक्षेत्रात गेल्या पाच वर्षांत वाघ, बिबटे, अस्वल आदी वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात १० जण ठार झाले असून २०६ जणांना गंभीर इजा झाल्याचे दिसून आले आहे. वन विभागाने १० मृतांच्या कुटुंबांना एक कोटी ती लाख रुपये तर जखमी झालेल्या २०६ जणांना एक कोटी २२ लाख ३५ हजार रुपये नुकसानभरपाईदाखल दिले आहेत.

**सूत्र -** 'वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात २१४ व्यक्तींचा बळी', www.loksatta.com, ११.०२.२०२१.
'पाच वर्षांत वर्धा वन परिक्षेत्रात वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात १० जणांचा बळी', www.lokmat.com, ०८.०२.२०२१.

### चंद्रपूर जिल्ह्यात गेल्या १४ महिन्यांत वाघ, बिबट्यांच्या हल्ल्यात ४० माणसांचा मृत्यू



चंद्रपूर जिल्ह्यात टाळेबंदीच्या काळात माणूस-वन्यजीव संघर्ष अधिक तीव्र झाल्याचे दिसत आहे. गेल्या १४ महिन्यांत जंगलावर उपजीविका असलेल्या ग्रामीण भागातील ४० ग्रामस्थांचा वाघ व बिबट्यांच्या हल्ल्यात मृत्यू झाला आहे. मृत्युमुखी पडलेले सर्व ग्रामस्थ मोहफूल, तेंदूपत्ता, टेंभरे, बांबू तथा झाडूसाठी लागणारे गवत आणण्यासाठी जंगलात गेले होते.

जिल्ह्यात एकूण क्षेत्रफळाच्या ५० टक्के जंगल असून जिल्ह्यातील ७५० ते ८०० गावे जंगलाला लागून आहेत. जिल्ह्यात मागील दहा वर्षांत दरवर्षी सरासरी २० ते २५ लोकांचा व्याघ्र हल्ल्यात मृत्यू झाला. मात्र कोरोना काळात अवघ्या १४ महिन्यात ही संख्या ४० आहे.

वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात होणारे मृत्यू सहसा जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यापासून ते मे या कालावधीत होतात. एकदा पावसाळा सुरू झाला की वन्यप्राणी घनदाट जंगलात असतात. एप्रिल व मे महिन्यात सर्वाधिक मृत्यू होण्याचे कारण म्हणजे ग्रामस्थ जंगलात वनोपज गोळा करण्यासाठी जातात. याच काळात तीव्र उन्हाळ्यामुळे जंगलातील नैसर्गिक व कृत्रिम पाणवठे कोरडे पडतात, प्राणी पाण्याच्या शोधात गावात प्रवेश करतात व माणूस-वन्यजीव संघर्षाची तीव्रता वाढते. आता मात्र कोरोना काळात बेरोजगारीमुळे वनोपज गोळा करण्यासाठी जंगलात गेलेल्यांच्या मृत्यूच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे.

जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील दीड लाख मजूर दरवर्षी मिरची तोडण्यासाठी लगतच्या आंध्रप्रदेश व तेलंगणा या दोन राज्यांत जातात. कोरोनाच्या साथीमुळे या वर्षी बहुसंख्य मजूर मिरची तोडण्यासाठी गेले नाहीत. रोजगाराच्या शोधात असलेले हे मजूर दररोज जंगलात तेंदूपत्ता, मोहफुले, टेंभरे, बांबू व झाडूचे गवत वेचण्यासाठी जातात.

संपूर्ण दारूबंदी असलेल्या या जिल्ह्यात अवैध दारू तस्करी होते. त्यात मोहफुलाच्या दारूची भर पडली आहे. मोहफुलाची दारूविक्री चार ते पाच पट वाढल्याने अधिकाधिक मोहफुले वेचण्याच्या मोहात बहुसंख्य बेरोजगार जंगलात जातात. लोकांचा जंगलातील वावर वाढल्याने माणूस-वन्यजीव संघर्ष अधिक तीव्र होत आहे. ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर झोनमध्ये मागील वर्षी मोहफुलाच्या दारूची भट्टी चालवणाऱ्यांनी एक वाघीण व तिच्या दोन बछड्यांची शिकार केली होती (पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड १ अंक २*).

चंद्रपूर जिल्ह्यात ताडोबा, ताडोबा बफर, चंद्रपूर, ब्रह्मपुरी, मध्य चांदा वन विभाग, कन्हाळगाव अभयारण्यात वाघ आहेत. दुर्गापूर, ऊर्जानगर, वडगांव, दाताळा, अष्टभुजा या शहराला लागून असलेल्या भागातदेखील वाघांचा नियमित वावर दिसून येत आहे.

**सूत्र -** रवींद्र जुनारकर. 'चंद्रपूरमध्ये बिबट्यांच्या हल्ल्यांत वाढ', www.loksatta.com, १६.०४.२०२१.

इंग्रजीतील वन्यजीवविषयक द्वैमासिक 'प्रोटेक्टेड एरिआ अपडेट'चा १५० वा अंक प्रकाशित. अंक हवा असल्यास संपर्क: **marathipaupdate@gmail.com**

**अवनी वाघीण प्रकरणात वनाधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली**



यवतमाळ जिल्ह्यात पांढरकवडा परिसरात शिकाऱ्यांमार्फत ठार करण्यात आलेल्या टी-१ वाघिणीच्या मृत्यू प्रकरणी वन्यप्राणीप्रेमींचा न्यायालयीन लढा दोन पातळ्यांवर सुरू होता. त्यातील सर्वोच्च न्यायालयात दाखल प्रकरणात वनाधिकाऱ्यांविरुद्ध अवमान कारवाई करण्याची मागणी न्यायालयाने फेटाळली आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालाचा दाखला देत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठानेही तिथे दाखल याचिकेचा त्याच दृष्टिकोनातून विचार करावा, अशी विनंती महाराष्ट्राच्या वन विभागाने शपथपत्राद्वारे केली आहे.

घटनाक्रम थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे -

**नोव्हेंबर २०१८**

- यवतमाळ जिल्ह्यात पांढरकवडा परिसरातील टी-१ (अवनी) वाघिणीला गोळी घालून ठार करण्यात आले. पांढरकवडा-राळेगाव परिसरात २०१६ ते २०१८ या कालावधीत टी-१ ने १३ माणसांवर हल्ला केल्याचे सांगून तिला नरभक्षक ठरवण्यात आले होते. वाघिणीला बेशुद्ध करून जेरबंद करावे व ते शक्य न झाल्यास शेवटचा पर्याय म्हणून ठार करावे, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने वन विभागाला दिले होते. या मोहिमेनंतर वन विभागातील अधिकारी व कर्मचारी किंवा शिकाऱ्यांचा सत्कार करण्यात येऊ नये, असेही न्यायालयाने बजावले होते.
- पण, वन विभागाने सर्व मानक प्रणालीचे उल्लंघन करून टी-१ वाघिणीला ठार केले. टी-१ ला ठार करण्यासाठी राबवण्यात आलेल्या मोहिमेवर सरकारने २०० कोटी रुपये खर्च केले. शिकाऱ्यांना ३६ लाख रुपयांची प्रतिमा देऊन गौरवण्यात आले.

**फेब्रुवारी २०१९**

- राज्य सरकारने टी-१ प्रकरणाची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या समितीच्या अहवालात समोर आले की १३ माणसांपैकी फक्त ६ माणसांच्या मृत्यूशी टी-१ चा थेट संबंध असल्याचे जनुकीय विश्लेषणात दिसून आले. तसेच तिच्या शवविच्छेदनात ती नरभक्षक नसल्याचेही स्पष्ट झाले. टी-१ च्या मृत्यूशी संबंधित इतर अनेक प्रश्न अनुत्तरित राहिले. तरीही महाराष्ट्र वन विकास महामंडळाने टी-१ ला ठार करणाऱ्या शिकाऱ्यांना निर्दोष ठरवले आणि हे प्रकरण बंद केले.

**जानेवारी २०२०**

- महाराष्ट्र सरकारने टी-१ ला मारण्यासाठी वन विभागाने भाडोत्री शिकारी घेतल्याबद्दल या प्रकरणी पुन्हा चौकशी सुरू केली. वन्यजीव संवर्धक जेरील बेनेट यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे व राज्याचे पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांना या बाबत पत्र लिहून त्यांची भेट घेतल्यानंतर टी-१ मृत्यू प्रकरणाची पुन्हा चौकशी करण्याचा निर्णय घेण्यात आला. बेनेट यांनी पत्रात टी-१ प्रकरणातील संदिग्ध बाबींकडे लक्ष वेधले होते.

**फेब्रुवारी २०२१**

- टी-१ ला ठार करताना वन विभागाने सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन केल्याबद्दल वन विभागाचे तत्कालीन प्रधान सचिव विकास खरगे आणि मुख्य वनसंरक्षक ए. के. मिश्रा यांच्यासह १२ अधिकाऱ्यांना न्यायालयाच्या अवमान केल्याबद्दल नोटीस जारी केली.
  टी-१ ला ठार करताना वन विभागाने मानक प्रणालीचे पालन केले नाही. शिकाऱ्यांना महागडी भेट दिली; जी गावकऱ्यांनी दिल्याचे सांगितले, मात्र गावकऱ्यांची परिस्थिती यथातथा असताना मुख्य वन संरक्षकांनी हस्तक्षेप का केला नाही, असा सवाल करत तत्कालीन सचिव व मुख्य वनसंरक्षकांविरुद्ध कारवाई करण्याची मागणी करणारी याचिका वन्यप्राणीप्रेमी संगीता डोगरा आणि 'अर्थ ब्रिगेड फाउण्डेशन'ने दाखल केली होती. या याचिकेच्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने नोटीस जारी केली.

**मार्च २०२१**

- वन विभागाने सर्वोच्च न्यायालयात शपथपत्राद्वारे सांगितले की टी-१ला न्यायालयाच्या आदेशानुसार ठार करण्यात आले. त्यानंतर गावकऱ्यांनी जल्लोष केला. त्यामध्ये वनाधिकारी सहभागी नव्हते. त्यामुळे या जल्लोषाला वन संरक्षकांना कसे जबाबदार धरता येईल, असा सवाल याचिकाकर्त्यांना केला आणि वन विभागाचे तत्कालीन प्रधान सचिव विकास खरगे आणि मुख्य वनसंरक्षक ए. के. मिश्रा यांच्यासह १२ अधिकाऱ्यांविरुद्ध अवमान कारवाई करण्याची मागणी सरन्यायाधीश शरद बोबडे, न्या. ए. एस. बोपन्ना आणि न्या. व्ही. रामसुब्रम्हण्यम यांनी फेटाळली.

टी-१ मृत्यू प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयातील याचिकेसंदर्भातील घडामोडी

- टी-१ मृत्यू प्रकरणी शिकारी शफत अली खान, असगर अली खान, मुखबिर शेख व पशुवैद्यक अधिकारी डॉ. बी. एम. कडू यांच्यावर फौजदारी कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करणारी याचिका वन्यप्राणीप्रेमी सरिता सुब्रम्हण्यम यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल केली.
- या याचिकेच्या सुनावणी दरम्यान टी-१ या वाघिणीला ठार मारण्याचा कट दोन पशूवैद्यकांचा होता, असे प्रतिज्ञापत्र शिकारी शफत अली खान व असगर अली खान यांनी न्यायालयात सादर केले. 'या पशुवैद्यकांनी महाराजबागमधील एका वाघिणीचे मूत्र अवनी वाघिणीच्या क्षेत्रात फवारले. यामुळे ती स्वत:ला व शावकांना असुरक्षित समजू लागली. तेव्हापासून ती एकाच रस्त्यावर दबा धरून राहायची. आम्ही तिला बेशुद्ध करण्यासाठी डॉट मारला. पण, डॉट मारल्यानंतर वाघीण बेशुद्ध व्हायला किमान १० ते १५ मिनिटे लागतात. या दरम्यान ती अधिकच चवताळली व तिने पथकावर हल्ला केला. आम्ही खुल्या जिप्सीत होतो. चालकही घाबरल्याने वाहन रस्त्याखाली उतरले. वाघीण पाचसात मीटर अंतरावर असताना स्वत:चा व पथकातील इतरांचा जीव वाचवण्यासाठी तिला ठार करावे लागले,' असे या प्रतिज्ञापत्रात नमूद करण्यात आले आहे.
- टी-१ वाघिणीला ठार मारताना उल्लंघन झालेल्या नियमांची माहिती तक्ता स्वरुपात सादर करा, असे आदेश न्यायालयाने याचिकाकर्त्यांना दिले.
- या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा दाखला देत वन विभागाने उच्च न्यायालयात शपथपत्र दाखल केले आहे. या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला असून त्यात कारवाईची मागणी फेटाळली आहे, हे लक्षात घेऊन नागपूर खंडपीठाने निर्णय घ्यावा, अशी विनंती वन विभागाने केली आहे.


**सूत्र** – केतन पळसकर. 'अवनी प्रकरणातील आरोप निरर्थक, वन विभागाचे उच्च न्यायालयात शपथपत्र', www.esakal.com, १०.०३.२०२१.
ललित पत्की. 'अवनी वाघीण शिकार प्रकरण: सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय', maharashtratimes.com, २६.०२.२०२१.
गुरशरण भल्ला. 'Here's A Timeline Of Tigress Avni's Killing Blamed For 13 Deaths And The Controversy Around It', www.indiatimes.com, २६.०२.२०२१.
'अवनी वाघीण मृत्यू: कोर्टाने दिले अत्यंत महत्त्वाचे आदेश', maharashtratimes.com, २४.०२.२०२१.
'अवनी वाघीण शिकार प्रकरण: मुख्य वनसंरक्षकांना अवमान नोटीस', maharashtratimes.com, ११.०२.२०२१.
'अवनी शिकार प्रकरणात सचिव, मुख्य वनसंरक्षकांना अवमान नोटीस', www.loksatta.com, ११.०२.२०२१.
'अवनी वाघिणीला ठार मारण्याचा कट रचला होता! धक्कादायक प्रतिज्ञापत्र', maharashtratimes.com, १०.०२.२०२१.


## विदर्भातील संरक्षित क्षेत्रांमध्ये पाणीटंचाई आणि पाणवठ्यांवरील शिकारी टाळण्यासाठी नियोजन

विदर्भातील सहा व्याघ्र प्रकल्प, नऊ अभयारण्ये आणि २० राखीव वन क्षेत्रांतील नैसर्गिक पाणवठे आटू लागल्यामुळे वन्यजीव विभागाने कृत्रिम पाणवठे तयार करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

वन्यप्राण्यांना पाणीटंचाई जाणवू नये, या दृष्टीने नियोजन करावे. तसेच, मुख्य पाणवठ्यांवर स्वयंचलित कॅमेरे बसवावेत व व्याघ्र प्रकल्प क्षेत्र संचालक व इतर वरिष्ठ वनाधिकाऱ्यांनी तिथे रात्री-अपरात्री अचानक भेटी देऊन

तपासणी करावी, अशा सूचना वन्यजीव विभागाच्या प्रधान मुख्य वनसंरक्षकांनी दिल्या आहेत.

उन्हाळा सुरू होताच विदर्भातील पाणवठ्यांच्या भागात विषप्रयोगाद्वारे वाघ, बिबट्यांची शिकार केली जाते, हा दरवर्षीचा अनुभव असल्याने या सूचना दिल्या आहेत. पशुवैद्यकांनी पाणवठ्यांची दैनंदिन तपासणी करावी, वनकर्मचाऱ्यांना पाणवठ्यांच्या देखरेखीबाबत प्रशिक्षण द्यावे या सूचनांही त्यांनी दिल्या आहेत.

**सूत्र** – गणेश वासनिक. 'तर कॅमेऱ्यात व्याघ्रदर्शन, जंगलातील मुख्य पाणवठ्यांवर ट्रॅप कॅमेरे', www.lokmat.com, ०८.०३.२०२१.

## माणूस-वन्यजीव संघर्षाचे प्रसंग हाताळण्यासाठी पुणे वन विभागाचे शीघ्र प्रतिसाद दल

मानवी वस्तीत अचानक वन्यप्राणी शिरल्याने उद्भवलेली परिस्थिती हाताळण्यासाठी वन विभागाच्या पुणे कार्यालयाने शीघ्र प्रतिसाद दलाची स्थापना केली आहे.

मानवी वस्तीत वन्यप्राणी शिरल्यास त्याची त्वरित सुटका करून त्याला नैसर्गिक अधिवासात सोडण्यासाठी हे दल प्रयत्न करेल. वन विभागातील १२ अधिकारी, कर्मचाऱ्यांना अत्याधुनिक साधनसामग्री उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच प्राण्याच्या सुटकेसाठी वाहन, बचाव पिंजरे, प्राण्यांना भुलीचे इंजेक्शन देण्यासाठी बंदूक आणि दलातील जवानांना आवश्यक अन्य साहित्य उपलब्ध करून दिले जाणार आहे, असे पुणे कार्यालयातील उपवनसंरक्षकांनी सांगितले.

शीघ्र प्रतिसाद दलातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यास सुरुवात झाली आहे. बघ्यांची गर्दी तातडीने हटवून त्वरित मदतकार्य सुरू करण्यासाठी या दलाला विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे. तसेच वन विभाग लवकरच हेल्पलाइन क्रमांकदेखील उपलब्ध करून देणार आहे.

पुण्यात डिसेंबर २०२० मध्ये दोन वेळा गवे मानवी वस्तीत आले होते. पुणे जिल्ह्यासह राज्याच्या वेगवेगळ्या भागात बिबट्या मानवी वस्तीत शिरण्याच्या घटना वाढीस लागल्या आहेत. अशा परिस्थितीत असे शीघ्र प्रतिसाद दल उपयुक्त ठरेल.

**सूत्र** – 'वनविभागाकडून शीघ्र प्रतिसाद दलाची स्थापना', www.loksatta.com,१०.०२.२०२१.

## व्याघ्र प्रकल्पातून पुनर्वसनासाठी वाढीव रकमेमुळे राज्यात पुनर्वसन प्रक्रियेला गती येण्याची शक्यता

राष्ट्रीय व्याघ्र संरक्षण प्राधिकरणाने व्याघ्र प्रकल्पातून पुनर्वसनासाठी दिली जाणारी रक्कम दहा लाख रुपयांवरून पंधरा लाख रुपये प्रतिकुटुंब केली आहे. त्यामुळे पुनर्वसनासाठी इच्छुकांचे प्रमाण वाढू शकेल, असा आशावाद वनाधिकाऱ्यांसह राज्य वन्यजीव मंडळाच्या सदस्यानेही व्यक्त केला आहे.

आधी पुनर्वसनाकरता केंद्राच्या निधीची वाट पाहावी लागत होती. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाकडून निधी आल्यानंतरच पुनर्वसन प्रक्रिया पार पडत होती. २०१४ मध्ये राज्य सरकारने पुनर्वसनासाठी निधी देण्याची तयारी दाखवत शासन आदेश जारी केला. शेती असेल किंवा नसेल तरीही पूर्वी पुनर्वसनासाठी दहा लाख रुपये दिले जात होते. त्यामुळे शेती असलेल्यांचे नुकसान होत होते; पुनर्वसनात शेतीचा मोबदला मिळत नव्हता. मात्र, आता शेतीचा वेगळा मोबदला दिला जाणार आहे.

विदर्भातील संरक्षित क्षेत्रातून सुमारे ६,००० कुटुंबांचे पुनर्वसन गेल्या २० वर्षांमध्ये करण्यात आले आहे. त्यात ३६ गावांचा समावेश असून त्यातील सर्वाधिक २१ गावे ही मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील आहेत. ताडोबा अंधारी आणि नवेगाव नागझिरामधून प्रत्येकी ४, टिपेश्वरमधून २ तर बोर व्याघ्र प्रकल्पातून एका गावाचे पुनर्वसन झाले आहे. दोन दशकांच्या या प्रयत्नात अनेक स्वयंसेवी संस्था आणि कार्यकर्त्यांनीही महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

वन विभागाने दिलेल्या माहितीनुसार, ग्रामसभांच्या ठरावांनुसार या कुटुंबाचे पुनर्वसन करण्यात आले आहे. कुटुंबांना त्यांच्या पसंतीच्या ठिकाणी सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. काही व्यक्तींना गाइड किंवा वाहनचालक म्हणून रोजगार दिले आहेत. याशिवाय, गावातील तरुणांना रोजगारासाठी आवश्यक प्रशिक्षण दिले आहे. व्याघ्र प्रकल्पातून यशस्वी पुनर्वसन केल्याचे विविध दावे मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या वतीने करण्यात येत असले तरी पुनर्वसन झाल्यानंतरही काही ग्रामस्थांनी परत जाऊन आंदोलन केल्याच्या घटना घडल्या आहेत.

**सूत्र** - मोहन अटाळकर. 'वाढीव 'पॅकेज'मुळे व्याघ्र प्रकल्पातील पुनर्वसनाला गती मिळणार?', www.loksatta.com, १४.०४.२०२१.

## मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गावर वन्यप्राण्यांसाठी २९५ ठिकाणी उन्नत, भुयारी मार्ग आदी उपाययोजना

वन्यप्राण्यांना निर्धोकपणे रस्ता ओलांडता यावा यासाठी वन क्षेत्रातून जाणाऱ्या मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गावर २९५ ठिकाणी उन्नत, भुयारी मार्ग व इतर व्यवस्था करण्यात येत आहे.

सुमारे ७०० किलोमीटरचा हा महामार्ग १४ जिल्ह्यांतून जातो. त्यांपैकी ११८ किलोमीटरचा पट्टा हा वन क्षेत्रातून जातो. वाइल्डलाइफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाने केलेल्या पाहणीनुसार या परिसरात नीलगाय, चिंकारा, ससा, साळिंदर, रानडुक्कर, काळवीट, जंगली मांजर, बिबट्या, कोल्हा, लांडगा, तरस, अस्वल आदी प्राण्यांचा वावर आढळून आला आहे.

वन्यप्राण्यांचा अधिवास असलेल्या भागातून जाणाऱ्या महामार्गावर प्राण्यांना रस्त्याच्या एका बाजूकडून दुसऱ्या बाजूला जाता यावे याकरता १७९७ संरचना करण्यात येत आहेत. त्यापैकी वन क्षेत्रातून जाणाऱ्या महामार्गावर पाच मोठे पूल, १९ लहान पूल, १९ भुयारी मार्ग, सात उन्नत मार्ग यांसह आणखी लहान-मोठ्या अशा २९५ संरचना करण्यात येणार आहेत. महामार्गावरून भरधाव जाणारी वाहने आणि हॉर्नच्या आवाजाने प्राणी बुजतात, त्यामुळेही अपघात होण्याचा धोका असतो. हे लक्षात घेऊन पुलाखाली व भुयाऱ्यात ध्वनिरोधक यंत्रणा बसविण्यात येणार आहे.

**सूत्र** – 'वन्यप्राण्यांसाठी समृद्धीवर २९५ उन्नत, भुयारी मार्ग', www.loksatta.com,१०.०२.२०२१.

## महाराष्ट्रातील जंगलांत आग लागण्याच्या घटनांमध्ये दोन वर्षांत दुपटीने वाढ

'फॉरेस्ट सर्वे ऑफ इंडिया'च्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्रात जंगलात आग लागण्याच्या घटनांमध्ये दोन वर्षांत दुपटीने वाढ झाली आहे; वर्ष २०१९ मध्ये जंगलांत आग लागण्याच्या २२,४९९ घटनांची नोंद झाली होती आणि २०२१ मध्ये अशा ४४,८०९ घटना नोंदवण्यात आल्या आहेत. यातील बहुतांशी घटना जानेवारी ते मार्च या काळातील आहेत. त्यातल्या त्यात वर्ष २०२० मध्ये पावसामुळे कमी म्हणजे ६,३४२ आगीच्या घटनांची नोंद झाली आहे.

या सगळ्या आगी या तेंदू पाने व मोह फुले संकलनाच्या काळात लागलेल्या असल्याने त्या मानवनिर्मित असल्याचे वरिष्ठ वनाधिकाऱ्यांनी म्हटले आहे. गडचिरोली मंडळात मोठ्या प्रमाणावर तेंदू पाने संकलन केले जाते; या मंडळात यंदा १६,८०० घटनांची नोंद झाली आहे. त्या पाठोपाठ ठाणे (५,८५७), चंद्रपूर (४,८४७), कोल्हापूर (४,६१६), नागपूर (२,२७०), पुणे (१,८५०) आणि यवतमाळ (१,५८१) घटनांची नोंद आहे.



**सूत्र** – विजय पिंजरकर. 'Maharashtra forests on fire in January-March, heavy loss of wildlife habitat', timesofindia.indiatimes.com, ०५.०४.२०२१.

## महाराष्ट्रातील आणखी दोन ठिकाणांना जैवविविधता वारसा स्थळाचा दर्जा

महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बांबर्डे इथल्या हेवाळे ग्रामपंचायत हद्दीतील २.५९ हेक्टर क्षेत्रावरील 'मिरिस्टीका स्वॉम्प' म्हणून ओळखली जाणारी परिसंस्था जैवविविधता वारसा स्थळ म्हणून घोषित करण्याच्या प्रस्तावाला राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मंजुरी दिली आहे. त्याच बरोबर, जिल्ह्याच्या सावंतवाडी तालुक्यातील आंबोली (हिरण्यकेशी) इथे 'शिस्टुरा हिरण्यकेशी' ही मत्स्य प्रजाती ज्या ठिकाणी आढळून येते त्या ठिकाणाला राज्य शासनाने जैवविविधता वारसा स्थळाचा दर्जा दिला आहे. यासंबंधीची अधिसूचना एप्रिलच्या सुरुवातीला महसूल व वन विभागाने जारी केली.

शिस्टुरा हिरण्यकेशी या प्रजातीचा शोध सेंट्रल एग्रीकल्चरल रीसर्च इन्स्टिट्यूटचे डॉ. प्रविणराज जयसिन्हा यांच्यासह तेजस ठाकरे व शंकर बालसुब्रमण्यम यांनी लावला आहे. ही प्रजाती दुर्मीळ असून ती आंबोली (हिरण्यकेशी) या गावाच्या हिरण्यकेशी नदीच्या उगम स्थानाजवळ आढळून येते. इथे पुरातन महादेव मंदिर व कुंड आहे. कुंडासह व हिरण्यकेशी नदीच्या पात्रात या माशाचा अधिवास आहे. त्यामुळे या ठिकाणाला जैवविविधता वारसा स्थळाचा दर्जा देण्यात आला आहे.

**सूत्र -** 'सिंधुदूर्ग: हिरण्यकेशी क्षेत्र जैविक विविधता स्थळ घोषित', maharashtratimes.com, ०१.०४.२०२१.
'बांबर्डे येथील 'मिरिस्टिका स्वॉम्प' आता जैविक वारसा क्षेत्र', www.loksatta.com, ३०.०१.२०२१.

## वन्यजीव विषयक गुन्ह्यांच्या तपासात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या वनकर्मचाऱ्यांचा गौरव

वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ अंतर्गत येणाऱ्या गुन्ह्यांची उकल करण्यात उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या वनकर्मचारी, अधिकाऱ्यांची यादी महाराष्ट्र वन विभागाने विभागीय व जिल्हा पातळीवरील वनाधिकाऱ्यांकडे मागितली आहे. येत्या महाराष्ट्र दिनी १ मे रोजी त्यांना गौरवण्यात येणार आहे. १९ मार्च रोजी एक निवेदन जारी करून वन विभागाने ही माहिती दिली व नावांची यादी मागवली आहे.

वन्यजीवविषयक गुन्ह्यांची उकल करण्यात प्रत्यक्ष जंगलात फिरून काम करणाऱ्या अनेक वनकर्मचाऱ्यांचा सहभाग असतो. महाराष्ट्र वन नियम २०१४ आणि वन्यजीव कायदा १९७२ नुसार काही अटीशर्तींवर १०,००० रुपयांपर्यंत रोख बक्षीस देण्याची तरतूद आहे. मात्र, गुन्ह्यांची उकल झाली तरी न्यायिक प्रक्रियेत जो काळ जातो त्यामध्ये या वनकर्मचाऱ्यांच्या योगदानाची दखल घेण्याचे राहून जाते, असे अतिरिक्त प्रधान मुख्य वन संरक्षक (संरक्षण) संजीव गौर यांनी सांगितले.

**सूत्र** - 'Maharashtra forest dept plans to felicitate staff for probing Wildlife Act violations', www.hindustantimes.com, २३.०३.२०२१.

## महाराष्ट्रात २६ जिल्ह्यांमध्ये मानद वन्यजीव रक्षकांच्या नेमणुका

महाराष्ट्राच्या २६ जिल्ह्यांमध्ये शासनाने ४८ मानद वन्यजीव रक्षकांच्या नेमणुका केल्या आहेत. वर्ष २०१७ मध्ये नेमलेल्या मानद वन्यजीव रक्षकांचा तीन वर्षांचा कार्यकाल गेल्या वर्षी संपला. त्यांच्या जागेवर या नेमणुका करण्यात आल्या आहेत.

रोहीत कडू, उधमसिंह यादव व अजिंक्य भाटकर (नागपूर); कौशल मिश्रा व संजय इंगळे (वर्धा); मुकुंद धुर्वे आणि सावन बहेकर (गोंदिया); शाहीद खान व नदीम खान (भंडारा); मिलिंद उमरे (गडचिरोली); मनजितसिंह सिख (बुलढाणा); सावन देशमुख आणि जयंत वडतकर (अमरावती);विक्रम राजूरकर व बाळ कळणे (अकोला); विवेक करंबेळकर (चंद्रपूर); रमझान विरानी आणि श्याम जोशी (यवतमाळ); गौरव इंगळे (वाशिम) यांसह मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये या नेमणुका झाल्या आहेत.

**सूत्र** - 'State appoints 48 wildlife wardens', timesofindia.indiatimes.com, २३.०३.२०२१.

## खवलेमांजराची तस्करी करणारे राज्याच्या विविध भागांतील नऊ जण अटकेत



औरंगाबाद जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यात खवलेमांजर (पँगोलीन) पकडून त्याची तस्करी करणाऱ्या मुंबई, पैठण, औरंगाबाद, फरदापूर, तोंडापूर इथल्या नऊ जणांना सिल्लोड वन विभागाने मार्च महिन्याच्या सुरुवातीला पकडले.

खवलेमांजराच्या तस्करीबाबत खबर मिळाल्यावर वन विभागाच्या पथकाने सिल्लोडमध्ये एका हॉटेलजवळ सापळा रचला होता. पथकाने एका चारचाकी मोटारीला थांबवून तपासणी केली आणि पोलिसी खाक्या दाखवताच मोटारीतील तस्करांनी माहिती दिली. त्यानुसार, तालुक्यातील अनाड गावात एका शेतात धाड घातली. तिथे खवलेमांजरासह एक दुचाकी व तीन आरोपी सापडले. हे खवलेमांजर चार कोटी रुपयांत विकण्याचा आरोपींचा बेत होता.

या प्रकरणात एकूण नऊ जणांना अटक करण्यात आली आहे. वन विभाग आणखी तपास करत आहे.

**सूत्र** – 'सिल्लोडमध्ये खवल्यामांजराची तस्करी करणारे नऊ जण अटकेत', www.lokmat.com, ०४.०३.२०२१.

## डॉ. सतीश पांडे यांना 'वर्ल्ड आऊल हॉल ऑफ फेम'चा पुरस्कार

डॉ. सतीश पांडे यांच्या घुबड पक्ष्याच्या संवर्धन मोहिमेची दखल 'इंटरनॅशनल आऊल सेंटर' आणि 'ग्लोबल आऊल प्रोजेक्ट' या संस्थांनी घेतली आहे. या संस्थांच्या 'वर्ल्ड आऊल हॉल ऑफ फेम' या समितीने पक्षितज्ञ डॉ. पांडे यांना 'स्पेशल अचिव्हमेंट' पुरस्कार जाहीर केला आहे.

**सूत्र** - चैत्राली चांदोरकर. 'डॉ. सतीश पांडे : पक्षिसंवर्धनाचा वसा घेतलेले 'आऊल मॅन'', maharashtratimes.com, २२.०२.२०२१.



## माणूस-बिबट्या संक्षिप्त वृत्त

| जिल्हा | तालुका | घटना | सूत्र |
|---|---|---|---|
| उस्मानाबाद | उस्मानाबाद | घाटंग्री तांडा शिवारात मृत बिबट्या; उपासमारीमुळे मृत्यू. | लोकमत, ०७.०३.२०२१<br>लोकमत, ०९.०३.२०२१ |
| चंद्रपूर | बल्लारपूर | बल्लारपुरात बिबट्याच्या हल्ल्यात दोन बकऱ्या ठार; त्यानंतर रोजच बिबट्यांची लोकवस्तीत हजेरी | लोकमत, ०८.०३.२०२१ |
| ठाणे | शहापूर | मुंबई-नाशिक महामार्गावर आटगाव इथे वाहनाच्या धडकेत बिबट्याचा मृत्यू | लोकसत्ता, ०४.०२.२०२१ |
| नाशिक | इगतपुरी | ठाकूरवाडीत एका आठवड्यात बिबट्याचे दोन हल्ले; घोडेवाडीतही हल्ला | लोकसत्ता, १६.०३.२०२१ |
| | निफाड | धारणगाव वीर इथे एकाच दिवसात दोन बिबटे जेरबंद | महाराष्ट्र टाइम्स, २६.०२.२०२१ |
| | बागलाण | आराई चिंचकसाड परिसरात मादी बिबट्या व बछड्यांकडून बोकड, शिंगरू, पाळीव कुत्रे फस्त; तीनच दिवसांनी शेतकऱ्यावर हल्ला | महाराष्ट्र टाइम्स, १५.०२.२०२१ |
| | | डांगसौंदाणे इथे गावाच्या वेशीजवळ मादी बिबट्या जेरबंद | महाराष्ट्र टाइम्स, २८.०२.२०२१ |
| परभणी | जिंतूर | खरदडी इथे बिबट्याच्या हल्ल्यात शेतकरी जखमी | ईसकाळ, २९.०३.२०२१ |
| पालघर | | मुंबई-अहमदाबाद महामार्गावर वाहनाच्या धडकेत बिबट्या ठार | लोकसत्ता, १६.०२.२०२१ |
| बीड | पाटोदा | महिंद्रवाडीत विहिरीत मृत बिबट्या | लोकसत्ता, २४.०३.२०२१ |
| भंडारा | पवनी | कलेवाडा शेतशिवारात विहिरीत दोन मृत बिबटे; वन विभागाकडून शेतमालकाची कसून चौकशी | लोकमत, १६.०२.२०२१;<br>लोकमत, १७.०२.२०२१ |
| यवतमाळ | आर्णी | आर्णी वनपरिक्षेत्रात माळेगाव शिवारात मृत बिबट्या | लोकमत, २४.०२.२०२१ |
| सांगली | शिराळा | तडवळे इथे बिबट्याच्या हल्ल्यात ११ महिन्यांचे मूल ठार | महाराष्ट्र टाइम्स, २२.०२.२०२१ |
| | | सांगली शहरात पकडलेल्या बिबट्याची चांदोली अभयारण्यात रवानगी | ईसकाळ, ०१.०४.२०२१ |

## राष्ट्रीय बातम्या

### भारतातील वाघांचे जनुकीय वैविध्य कमी होण्याची भीती

वाघांच्या स्थलांतराच्या मार्गांकडे होणारे दुर्लक्ष, मानवी हस्तक्षेपामुळे होत असलेले अधिवासाचे तुकडे यामुळे भारतातील वाघांचे आहे तिथल्याच समूहांमध्ये प्रजनन होण्याची शक्यता बळावली आहे. परिणामी, देशातील वाघांचे जनुकीय वैविध्य संपण्याची भीती तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

'मॉलेक्युलर बायोलॉजी अँड इवोल्युशन' या शोधपत्रिकेत या विषयावरील शोधनिबंध प्रकाशित झाला आहे. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ बायोलॉजिकल सायन्सेस, बंगळुरू या संस्थेतील उमा रामकृष्णन आणि अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापिठातील एली आर्मस्ट्रॉंग यांच्यासह अन्य संशोधकांनी एकत्र येऊन हा शोधनिबंध लिहिला आहे.

भारतात वाघांची संख्या गेल्या १२ वर्षांत दुप्पट झाली आहे. २००६ मध्ये १४११ तर २०१८ मध्ये २९६७ वाघ असल्याचे व्याघ्रगणनेतून समोर आले. मानवी हस्तक्षेप आणि

प्रकल्पांमुळे वाघांचा अधिवास घटत आहे. एका जंगलातून दुसऱ्या जंगलात जाण्यासाठी असलेल्या त्यांच्या स्थलांतर मार्गात अडथळे येत आहेत. महाराष्ट्रातील वाघांना हा धोका सर्वाधिक आहे कारण दोन जंगलांतील संचारमार्गाच्या व्यवस्थापनात राज्य कमी पडत असल्याचे वृत्तात म्हटले आहे.

अधिवासाच्या आणि जोडीदाराच्या शोधात वाघ स्थलांतर करतात. वाघाने लांब पल्ल्याचे स्थलांतर केल्याच्या नोंदी महाराष्ट्रात आहेत. मात्र, स्थलांतरादरम्यान वाघ बेपत्ता झाल्याच्या आणि मृत्युमुखी पडल्याच्या घटनाही आहेत. २०१४ साली वर्धा जिल्हयातील बोर अभयारण्यातून एका वाघाने अमरावती जिल्हयातील पोहरा-मालखेडच्या जंगलात तर २०१६ साली नागपूर जिल्हयातील कळमेश्वर-कोंढाळी इथून एका वाघाने याच जंगलात स्थलांतर केले होते. मात्र, त्यानंतर या वाघांचा काहीच पत्ता नाही. बोरमधील टी-२७ वाघीण स्थलांतराच्या प्रयत्नात वीजेचा धक्का बसून ठार झाली. नागझिरा अभयारण्यातून उमरेड कऱ्हांडला अभयारण्यात गेलेला 'जय' बेपत्ता झाला.

स्थलांतर मार्गातील अडथळ्यांमुळे आहे तिथल्याच परिसरातील वाघांमध्ये आपापसांत प्रजनन होण्याची शक्यता आहे. अशा प्रकारे प्रजननातून निर्माण होणाऱ्या वाघांच्या पिढ्या भविष्यात जनुकीय वैविध्य कमी झाल्यामुळे अशक्त, जगण्यास पुरेशा सक्षम नसतील, अशी भीती आहे. राज्यात अलीकडेच दहा संवर्धन राखीव क्षेत्रे घोषित करण्यात आली. संचारमार्गासाठी ते योग्य असले तरी व्यवस्थापनाचे गांभीर्य असेल तरच भविष्यातील ही भीती टाळता येणे शक्य आहे, असे मत राज्य वन्यजीव मंडळाच्या सदस्याने व्यक्त केले.

**सूत्र** – 'वाघांचे आनुवंशिक वैविध्य संपण्याची भीती', www.loksatta.com, २७.०२.२०२१.
'Study suggests habitat loss is leading to inbreeding of Indian tigers', outlookindia.com, २३.०२.२०२१.



## देशव्यापी व्याघ्रगणनेला एप्रिलपासून सुरुवात

देशातील २१ राज्यांत एप्रिल २०२१ पासून व्याघ्रगणना केली जाणार आहे. देशभरात सर्व ठिकाणी एकाच वेळी ही प्रक्रिया होईल.

राज्यांतील वन विभाग, राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या मार्गदर्शनाखाली आणि भारतीय वन्यजीव संस्थेच्या मदतीने सर्व टप्पे पूर्ण करणार आहेत. गणनेच्या या प्रक्रियेत वाघांच्या संख्येबरोबरच वनांची स्थिती, वनस्पती, पक्षी, इतर प्राणी आणि मानवी हस्तक्षेप या बाबीही लक्षात घेतल्या जाणार आहेत.

वाघ असलेल्या प्रत्येक जंगलात ही मोहीम राबवण्यात येईल. या मोहिमेनंतर देशभरातील वाघांची आकडेवारी जुलै २०२२पर्यंत हाती येईल असा अंदाज आहे.

| व्याघ्रगणनेचे वर्ष | देशातील व्याघ्रसंख्या | महाराष्ट्रातील व्याघ्रसंख्या |
|---|---|---|
| २००६ | १४११ | १०३ |
| २०१० | १७०६ | १६९ |
| २०१४ | २२२६ | १९० |
| २०१८ | २९६७ | ३२१ |

**सूत्र -** पंकज मोहरीर. 'एप्रिलपासून प्रत्यक्ष व्याघ्रगणना', maharashtratimes.com, २३.०२.२०२१.

## वर्ष २०२१-२२ च्या अर्थसंकल्पात पर्यावरण मंत्रालयासाठी तरतुदीत गेल्या वर्षाच्या तुलनेत आठ टक्क्यांची कपात

केंद्र सरकारने वर्ष २०२१-२२ च्या अर्थसंकल्पात पर्यावरण मंत्रालयासाठी असलेली तरतूद गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत आठ टक्क्यांनी कमी केली आहे.

हवामान बदलावर उपाययोजनांसाठी तरतुदीत गेल्या वर्षीच्या तुलनेत १० कोटी रुपयांची कपात केली आहे. गेल्या वर्षी ४० कोटी रुपयांची तरतूद होती; ती यंदा ३० कोटी रुपये करण्यात आली आहे. व्याघ्र प्रकल्पासाठी असलेली तरतूद गेल्या वर्षीच्या तुलनेत ५० कोटी रुपयांनी कमी केली आहे. गेल्या दोन आर्थिक वर्षांमध्ये व्याघ्र प्रकल्पासाठी असलेल्या तरतुदीत १०० कोटी रुपयांची कपात करण्यात आली आहे. २०१९-२० च्या अर्थसंकल्पात व्याघ्र प्रकल्पासाठी ३५० कोटी रुपयांची, २०२०-२१ मध्ये ३०० कोटी रुपयांची तरतूद होती तर

वर्ष २०२१-२२ च्या अर्थसंकल्पात ही तरतूद २५० कोटी रुपये आहे.

हत्ती संरक्षण-संवर्धन प्रकल्पासाठी असलेल्या तरतुदीत गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत दोन कोटी रुपयांची कपात करण्यात आली आहे. गेल्या अर्थसंकल्पात ३५ कोटी रुपयांची तरतूद होती तर यंदाच्या अर्थसंकल्पात ती ३३ कोटी रुपये इतकी आहे.

राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणासाठी असलेल्या आर्थिक तरतुदी गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा ५० लाख रुपयांची कपात करण्यात आली आहे. राष्ट्रीय वनीकरण कार्यक्रमासाठी गेल्या अर्थसंकल्पात २४६ कोटी रुपयांची तरतूद होती ती यंदा २३५ कोटी रुपये करण्यात आली आहे.

मात्र, राष्ट्रीय किनारपट्टी अभियानासाठी गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा दुप्पट तरतूद केली आहे; तर ४२ शहरी भागांमधील हवेचे प्रदूषण कमी करण्यासाठी तब्बल २,२१७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

**सूत्र** - 'Union Budget 2021: Govt earmarks ₹2,217 crore for tackling air pollution', www.hindustantimes.com, ०१.०२.२०२१.

## वनजमिनींच्या वनेतर वापराबाबत निर्णयाच्या राज्य सरकारांच्या अधिकारावर केंद्राकडून मर्यादा

केंद्र सरकारने तत्त्वतः मंजुरी दिलेल्या पायाभूत सुविधा प्रकल्पांना पर्यावरणविषयक कोणत्याही जादा अटी राज्य सरकारे वा केंद्रशासित प्रदेशांच्या प्रशासनाला लागू करता येणार नाहीत, असे केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने स्पष्ट केले आहे. २२ मार्च २०२१ रोजी मंत्रालयाने राज्य व केंद्रशासित प्रदेशांना पाठवलेल्या पत्राद्वारे हा नवा नियम मंत्रालयाने कळवला आहे.

ओदिशा सरकारने एका खाणकाम प्रकल्पाच्या ठिकाणी वन्यजीव व्यवस्थापन आराखड्याच्या अंमलबजावणीची मागणी केल्यावर त्याच्या उत्तरादाखल आणि स्पष्टीकरण म्हणून केंद्र सरकारने हे पत्र सगळ्याच राज्य व केंद्रशासित प्रदेशांना पाठवल्याचे म्हटले आहे.

राज्य व केंद्रशासित प्रदेश प्रशासनाला केवळ अपवादात्मक परिस्थितीत अतिरिक्त अटी लागू करायच्या असतील तर त्यांना केंद्र सरकारची आगाऊ परवानगी घ्यावी लागेल; अपवाद का करावा याचे योग्य स्पष्टीकरण द्यावे लागेल असे केंद्राने पाठवलेल्या पत्रात दिले आहे.

केंद्राने तत्त्वतः मंजुरी दिल्यानंतर राज्य सरकारने नव्या अटी घालण्याने संभ्रम व प्रकल्पनिर्मितीत अडथळे निर्माण होतात. खेरीज, केंद्राकडे मंजुरीसाठी प्रकल्पाचा प्रस्ताव पाठवला जातो तेव्हा त्यापूर्वी राज्य सरकारने त्यासंदर्भात आवश्यक बाबींची पूर्तता केली आहे, असे गृहीत धरून केंद्र मंजुरी देते. अशा परिस्थितीत केंद्राने तत्त्वतः मंजुरी दिल्यानंतर राज्य नव्या अटी घालणार असेल तर त्याचा अर्थ राज्याने प्रस्ताव केंद्राकडे पाठवण्यापूर्वी आवश्यक बाबींची पूर्तता केली नव्हती असा होतो, असे केंद्र सरकारच्या पत्रात म्हटले आहे. केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या 'परिवेश' या संकेतस्थळावर हे पत्र उपलब्ध आहे.

वन संवर्धन कायदा, १९८० नुसार वन जमिनीचा वापर वनेतर कारणांसाठी करण्याची परवानगी दिली जाते तेव्हा प्रकल्प विकासकाने भरपाईदाखल मागितलेल्या जमिनीएवढी वन असलेली जमीन किंवा तसे वन उपलब्ध नसेल तर कमी दर्जाचे वन असलेल्या दुप्पट जमिनीवर वनीकरणाचा खर्च देणे बंधनकारक आहे. सध्या हा पैसा भरपाईदाखल निधी (कॉम्पेनसेटरी अफॉरेस्टेशन फंड) म्हणून गोळा केला जातो व तो संवर्धन आणि वन्यजीव व्यवस्थापनासाठी वापरला जातो.

कायदा असतानाही राज्य सरकारांनी केंद्राने तत्त्वतः मंजुरी दिल्यानंतर जादा अटी घातल्याचे प्रसंग आहेत. त्यामुळे, मूळ नियमाला धरूनच केंद्र सरकारने हे पत्र पाठवले आहे; आहे तोच नियम पत्रात स्पष्ट करून मांडला आहे, असे केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या अधिकाऱ्याने सांगितले.

मात्र, पर्यावरण क्षेत्रातील स्वयंसेवी संस्था, पर्यावरण कायदेविषयक कार्यकर्त्यांनी केंद्र सरकारच्या हेतूवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. या पत्रामुळे पर्यावरणविषयक कायदे-नियमांमधील ताकद कमी केली जात आहे; संविधानानुसार वने ही केंद्र व राज्य सरकारांच्या समवर्ती सूचीत येतात त्यामुळे केंद्राने मंजुरी दिल्यानंतरही अंमलबजावणीबाबत अंतिम आदेश देण्याचे अधिकार राज्य सरकारला असतात. परंतु, केंद्र सरकारच्या पत्रामुळे वनजमिनीच्या वापराबाबत अधिकारांचे केंद्रीकरण होत आहे, अशा आशयाच्या प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केल्या आहेत.

**सूत्र** – जयश्री नंदी. 'Centre limits states' role in forest matters', www.hindustantimes.com, २९.०३.२०२१.

## हिमाचल प्रदेशातील दोन संरक्षित क्षेत्रांचे व्यवस्थापन देशात सर्वोत्तम - व्यवस्थापन मूल्यांकन अहवाल

देशातील १४६ राष्ट्रीय उद्याने आणि वन्यजीव अभयारण्यांचा व्यवस्थापन प्रभावशीलता मूल्यांकन अहवाल ११ जानेवारी रोजी जाहीर झाला. त्यानुसार हिमाचल प्रदेशातील तीर्थन वन्यजीव अभयारण्य व ग्रेट हिमालयीन राष्ट्रीय उद्यानाचा गुणांक सर्वाधिक ८४.१७ टक्के तर उत्तर प्रदेशातील कासव वन्यजीव अभयारण्याचा गुणांक सर्वात कमी म्हणजे २६.६६ टक्के आहे.

देशातील सर्वोत्कृष्ट दहा राष्ट्रीय उद्याने, पाच किनारी व समुद्री उद्याने आणि पाच प्राणिसंग्रहालयांची यादी आता प्रत्येक वर्षी जाहीर करून त्यांचा गौरव करण्यात येईल, अशी घोषणा केंद्रीय पर्यावरण मंत्री प्रकाश जावडेकर यांनी केली.

जम्मू आणि कश्मीरमधील त्रिकुटा अभयारण्य हे अजूनही वन्यजीव विभागाकडे हस्तांतरित करण्यात आलेले नाही. नुगू अभयारण्य हे बंदीपूर व्याघ्र प्रकल्पाचा तर सजनाखली हा सुंदरबन व्याघ्र प्रकल्पाचा एक भाग आहे. त्यामुळे त्यांचे मूल्यांकन करण्यात आले नाही. हे तीन वगळता देशातील इतर सर्व राष्ट्रीय उद्याने आणि वन्यजीव अभयारण्यांचे मूल्यांकनाचे चक्र पूर्ण झाले आहे.

| श्रेणी | श्रेणीतील संरक्षित क्षेत्रांची संख्या |
|---|---|
| अतिशय उत्कृष्ट | ११ |
| उत्कृष्ट | ४६ |
| साधारण | ५६ |
| वाईट | ६ |

**सूत्र** – 'देशातील सर्वोत्कृष्ट राष्ट्रीय उद्याने, प्राणिसंग्रहालयांना गौरवणार', www.loksatta.com,१६.०१.२०२१.



### मृत्यूलेख

### उत्तम संपादक आणि सहृदयी माणूस

ज्येष्ठ पत्रकार आणि 'साप्ताहिक सकाळ'ला दर्जेदार साप्ताहिक म्हणून ओळख निर्माण करून देणारे संपादक **सदा डुंबरे** यांचे कोविड-१९मुळे २६ फेब्रुवारी २०२१ रोजी निधन झाले.

डुंबरे यांचा पर्यावरण संरक्षण-संवर्धनाच्या क्षेत्रात कार्यरत संस्था, कार्यकर्ते, संशोधकांशी संपर्क होता. संपादक म्हणून हे साहजिक म्हटले तरी त्यात वेगळेपण असे होते की पर्यावरण हा त्यांच्या विशेष आवडीचा, अभ्यासाचा विषय होता. संरक्षण-संवर्धनातील आव्हाने, वन्यजीव-माणूस संघर्ष, संरक्षित क्षेत्रांसमोरील आव्हाने, या विषयीची धोरणे हे चांगल्या संपादकांना ठाऊक असते तसे त्यांना ठाऊक होतेच; पण विशेष असे की त्याबरोबर पर्यावरणशास्त्रातील संकल्पना, वनस्पतींची शास्त्रीय नावे हे देखील त्यांना नेमके ठाऊक असे.

डुंबरे बुद्धिवादी होते त्याचबरोबर ते सहृदयी होते. समोरच्या व्यक्तीचे – मग ती व्यक्ती वया-अनुभवाने त्यांच्यापेक्षा कितीतरी लहान असली तरीही – शांतपणे, नीट लक्ष देऊन ऐकणारे आणि त्यावर आपले प्रामाणिक मत मोकळेपणाने मांडणारे असे होते. त्यामुळे त्यांच्याशी गप्पा मारताना त्यांच्या ज्येष्ठ, अनुभवी, व्यासंगी असण्याचे दडपण कधी आलेच नाही. ते गेले त्यानंतर त्यांच्याविषयी आलेले मृत्यूलेख, त्यांच्या ओळखीतल्यांशी झालेला संवाद यातून लक्षात आले की त्यांच्या संपर्कात आलेल्या बहुदा सर्वांसाठी ते असेच होते.

'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा'च्या कल्पनेपासून ते त्याचा प्रत्येक अंक प्रकाशित झाल्यानंतर आपला अभिप्राय नोंदवण्यापर्यंत प्रत्येक टप्प्यावर डुंबरे यांचे या प्रकाशनात मोलाचे योगदान आहे. इथून पुढे एका चांगल्या वाचक, मार्गदर्शक आणि हितचिंतकाची उणीव कायम भासेल.

'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा'चे संपादक मंडळ आणि प्रकाशक 'कल्पवृक्ष' यांच्या वतीने सदा डुंबरे यांना आदरांजली.

\- **रेश्मा जठार**

NOW AVAILABLE

## The State of Wildlife and Protected Areas in Maharashtra

News and Information from the Protected Area Update 1996-2015

Published by

Duleep Matthai Nature Conservation Trust, Kalpavriksh and Rainfed Books




**<u>Contents:</u>**

**- Editor's Note**

**- Protected Areas in Maharashtra – a brief introduction**

**- Section 1:** *News and Information from protected areas*

**- Section 2:** *Analysis and Perspective:*

1) Media reporting on the protected areas in Maharashtra -_A thematic analysis (Trupthi Narayan and Pankaj Sekhsaria); 2) Wildlife coverage in the Marathi Print Media – a practitioner's perspective (Reshma Jathar); 3) Dividing lines- tribal rights and tiger reserves (Shiba Desor); 4) Rocky plateaus: Little understood treasures of the Western Ghats (Aparna Watve) and 5) Community Conserved Areas in Maharashtra (Neema Pathak Broome with Sneha Gutgutia, Shruti Mokashi, Kavya Chowdhry, Sarosh Ali and Rupesh Patil)

<u>ISBN: 9788192326931, Price Rs. 400; xi+235pp, 100 line drawings by Ashvini Menon</u>

For copies at 20% discount write to psekhsaria@gmail.com

## महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र सवलत योजना

'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा'ची वार्षिक वर्गणी रुपये १५०/- भरा आणि 'The State of Wildlife and Protected Areas in Maharashtra' हे महाराष्ट्रातील वन्यजीवविषयक बातम्या व माहितीचे संकलन असलेले पुस्तक निम्म्या किमतीत मिळवा.

किंवा

रुपये ३५०/- भरा आणि 'The State of Wildlife and Protected Areas in Maharashtra' पुस्तकासह आणि 'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र' किंवा 'Protected Area Update' यापैकी एका वार्तापत्राचे वर्षभराचे सदस्यत्व घ्या.

'The State of Wildlife and Protected Areas in Maharashtra' या पुस्तकाविषयी अधिक माहितीसाठी वरील चौकट पाहा.

पुस्तकाच्या परीक्षणासाठी पाहा -

(मराठी) https://marathi.thewire.in/author/parikshit-suryavanshi (लेखक - परीक्षित सूर्यवंशी)

(इंग्रजी) https://india.mongabay.com/2020/06/book-review-good-information-data-and-peoples-support-is-needed-for-conservation/ (लेखक – असद रहमानी)

अधिक माहितीसाठी संपर्क psekhsaria@gmail.com किंवा marathipaupdate@gmail.com

## दृष्टीकोन

### अभयारण्याची लांबलेली क्षेत्रनिश्चिती आणि माळढोक संवर्धन

विस्तीर्ण अशा दक्खनच्या पठारावर जे काही मोजके संरक्षित क्षेत्र आहे त्यातले एक महाराष्ट्रातील माळढोक अभयारण्य. अवर्षणग्रस्त प्रदेशात तग धरून राहण्यासाठी माळरान ही परिसंस्था विकसित झालेली आहे. इथल्या प्राण्यांचा प्रजनन काळ हा बहुतांशी पावसावर अवलंबून असतो आणि त्यामुळे प्रखर उन्हाळ्यानंतर येणारा वसंत ऋतू खूप काही बदल घडवून आणतो.

मानवी हस्तक्षेपामुळे माळरान हा अधिवास प्रचंड गतीने लोप पावत आहे. त्यामुळे मानवी हस्तक्षेपाविरहित माळरानावर अवलंबून प्रजातींची संख्या खूप कमी झाली आहे. माळढोक (ग्रेट इंडियन बस्टर्ड) म्हणजे माळरानावर अवलंबून असणाऱ्या वन्यजीवांचा एक प्रतिनिधीच. माळढोक, तणमोर (फ्लॉरिकन) पक्षी जे दक्खनच्या पठारावर काही दशकांपूर्वी सर्वत्र सहजपणे दिसायचे, त्यांची संख्या आता अगदी बोटांवर मोजण्याइतकी शिल्लक राहिली आहे. बाकीच्या जमिनीवर राहणाऱ्या पक्ष्यांचीही तीच गत आहे.

महाराष्ट्र हे देशातील एक महत्वाचे राज्य आहे जिथे घटत्या संख्येने का होईना पण माळढोक पक्षी आजही पाहायला मिळतो. १९७५ साली जागतिक बँकेच्या अर्थसाहाय्याने इथे अवर्षणप्रवण भाग प्रकल्प या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमांतर्गत गवताळ कुरणे व वृक्ष लागवड हे कार्यक्रम महाराष्ट्र वन विभागाने घेतले आणि जणू पुनर्जन्म मिळाल्यासारखा फायदा अधिवास संरक्षणाच्या दृष्टीने झाला.

महाराष्ट्र सरकारने १९७९ मध्ये अधिसूचनेद्वारे ७८१८.४७ चौ. किमी एवढे क्षेत्र माळढोक पक्षी अभयारण्य म्हणून जाहीर केले, त्यात सोलापूर आणि अहमदनगर जिल्ह्यातील तालुक्यांचा समावेश होता. १९८७ मध्ये आणखी ६७७.९७ चौ. किमी एवढा भाग आणखी त्यात अधिसूचनेद्वारे वाढवला गेला. परिणामी अभयारण्याचे क्षेत्रफळ ८४९६.४४ चौ. किमी एवढे मोठे झाले. नगर जिल्ह्यातील नेवासा, कर्जत, श्रीगोंदा हे तर सोलापूर जिल्ह्यातील करमाळा, माढा, मोहोळ, आणि उत्तर सोलापूर या तालुक्यांचा त्यात समावेश होता. जवळ जवळ २०० खेडी आणि असंख्य वस्त्यांचा यात समावेश झाला. पण ज्या पद्धतीने माळढोक संवर्धन होणे अपेक्षित होते व त्यासाठी स्थानिकांमध्ये जी जागृती व्हायला हवी होती ते मात्र होऊ शकले नाही.

'बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी' (बीएनएचएस) या संस्थेमार्फत या अभयारण्याचा सर्वंकष अभ्यास १९८०-८६, १९८८ व २००४ मध्ये करण्यात आला. अभयारण्याच्या सीमा पुनर्गठीत न झाल्याने सरसकट सर्व भूभागामध्ये जमीन व्यवहारात अडचणी निर्माण झाल्या आणि विषय सर्वोच्च न्यायालयात गेला. राष्ट्रीय वन्यजीव मंडळाचे प्रमुख डॉ. एम. के. रणजितसिंह यांनी वर्ष २००७ मध्ये सुचविले की अभयारण्यातील बराचसा मोठा भाग (गावे व खाजगी जमिनी) वगळला तर उरलेले ३४७ चौ. किमी क्षेत्र चांगल्या रीतीने जपले जाऊ शकते. या निर्णयाला काही लोकांनी विरोध केला आणि महाराष्ट्रातील संरक्षित क्षेत्राचे प्रमाण कमी होईल अशी भीती व्यक्त केली. तेव्हा परत २०११ साली भारतीय वन्यजीव संस्थे-(वाइल्डलाइफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया) -चे माजी अध्यक्ष डॉ. विश्वास सावरकर यांच्या अध्यक्षतेखाली समितीने १२२९.२४ चौ. किमी क्षेत्र गठीत करण्याची सूचना केली. पण स्थानिकांच्या प्रखर विरोधानंतर सरकारला २०१५ मध्ये आणखी एक समिती गठीत करावी लागली. या समितीच्या अहवालानुसार माळढोक अभयारण्याचे अतिरिक्त क्षेत्र वगळून आजमितीला ३६६.७३ चौ. किमी एवढे क्षेत्रफळ आहे.

ह्या सर्व गदारोळात स्थानिक लोक मात्र विनाकारण माळढोक पक्ष्याला आपल्या विकासात अडथळा समजायला लागले. आज या अभयारण्यात केवळ दोनतीन माळढोक पक्षीच शिल्लक आहेत जे कधीतरी दर्शन देतात. वेळेचे नियोजन आणि परिणामकारक उपाययोजना केल्याशिवाय हा पक्षी आणि अधिवास वाचू शकणार नाही. म्हणून महाराष्ट्र शासन माळढोकाच्या अधिवास संवर्धनासाठी जास्तीत जास्त प्रयत्न करीत आहे.

**- सुजित नरवडे**
(माळढोक आणि तणमोर प्रकल्प शास्त्रज्ञ, बीएनएचएस, राजस्थान)
ईमेल – s.narwade@bnhs.org

**- सुनील लिमये**
(अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, वन्यजीव, पश्चिम, मुंबई, महाराष्ट्र)
ईमेल – takatak_kop@yahoo.co.in

For private circulation/Printed Matter

To

From: **Kalpavriksh,** Apt. 5, Sri Dutta Krupa,
908 Deccan Gymkhana, Pune 411004